# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी  संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका  विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका  निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका  क्रमांक        :  ४७**

MAHMAR 19356/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पहिले / अंक ८ / जुलै २००१

## संपादकीय

### "जग जवळ आलं ... म्हणजे काय झालं..."

जग जवळ येत चालल्याचं भरभरून कौतुक करणारे आणि प्रगतीचे पोवाडे गाणारे भेटले की मनात प्रश्नांचं वादळ निर्माण होते. जग जवळ येत चाललंय म्हणजे काय, जगाचं एक खेडं निर्माण झालंय तर खेडुतांना (पूर्वी) एकमेकांबद्दल असणारी आत्मीयता कुठे आहे? सख्ख्या रक्ताच्या नात्याचाही अर्थ बदलत चालला आहे तरी जग जवळ आलं? वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, संगणक आणि आता 'माहितीचे मायाजाल' या साधनांचा व माध्यमांचा वापर करून एका बिंदू पासून दुसऱ्या बिंदूपर्यंत सहज संपर्क साधता आला म्हणजे जग जवळ आलं असं मानायचं का ?

स्वत: रहात असलेल्या इमारतीतल्या शेजारच्या घरात अपघात होतो, आत्महत्या होते आणि त्याची बातमी चार दिवसांनी वृत्तपत्रात वाचून कळते. शेजारी रहाणारा माणूस आपला कोणीच नसतो, असं जीवन जगायचं याला जग जवळ आले असं म्हणायचं का ? स्वत:ची आई किंवा बाप कोणत्या तरी वृद्धाश्रमात बेवारशासारखे प्राण सोडतात. तेव्हा 'मला यायला वेळ नाही. काय असेल तो खर्च कळवा, पाठवून देतो' असं अमेरिकेत बसून मुलगा किंवा मुलगी वृद्धाश्रम चालवणाऱ्यांना कळवण्याचे कर्तव्य करतो याला जग जवळ आलं असं म्हणतात का ? कधीही न पाहिलेल्या व्यक्तीशी 'चाट' वर तासन् तास गप्पा मारायच्या, पण घराच्या आजूबाजूच्या लोकांसाठी थोडसं हसायचंही नाही .. याचा अर्थ जग जवळ आलंय असं मानायचं का? पुण्यातही आता करार पद्धतीनं गप्पा मारायला येणारे अनोळखी पाहुणे तास दोन तासाच्या करारावर उपलब्ध होतात. मंगळागौर जागवून द्यायची असेल, विविध जुन्या नव्या खेळांचे पॅकेजेस् उपलब्ध करून दहा ते साडेबारा जागवून देणाऱ्या व शेळ्यांचे कमर्शियल ग्रुप्स ही गरज ठरते तेव्हा जग जवळ आलंय असं मानायचं का ?

एकविसाव्या शतकात प्रवेश करताना या सामाजिक स्थिती गतीचा विचार केला की जाणवतं ते एकच, हे बदलणे गरजेचे आहे व हे काम फक्त तरुण मित्रच करू शकतात. नातेसंबंधांची जाण विकसित झाली असेल असे संवेदनाक्षम तरुण, जर मनात आणतील तर विसाव्या शतकाच्या अखेरीस असणारी ही नियती बदलू शकतील. याचं साधं कारण म्हणजे स्वप्न पहाणारे डोळे आणि आव्हानांचे सूर्य उगवणारी क्षितीजे त्यांच्याजवळ आहेत. ज्या क्षणी 'आमच्या वेळेला असं नव्हतं, ते दिवस चांगले होते....' असं वाटायला लागतं तेव्हा हे तरुण म्हातारे होण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे असे समजावे. त्यामुळे उगवणारा प्रत्येक सूर्य नवा आहे या श्रद्धेने जीवनाकडे पाहून भविष्यातील लेणी खोदण्याचे स्वप्न जपणारी तरुण मने हवी आहेत.

असं झालं तरच जग जवळ येताना माणसेही माणुसकीच्या नात्याने जोडली जातील. नाहीतर आंध्रप्रदेशामधील पूरग्रस्तांना एक दिवसाचा पगार द्यायचा सरकारी फतवा आला की तोंडे वेंगाडली जातात. 'आमचा काय संबंध' असं आपापसात विचारलं जातं. पण अशा बनचुक्यांच्या जवळ आलेल्या जगात तरुण, छोटे विद्यार्थी हीच आशा असेल त्यासाठी समाजाने आपले हे तरुण मन वाईट मार्गाला लागणार नाही याची काळजी समाजाने डोळ्यात तेल टाकून घ्यायचास हवी. सत्य, शिव, सुंदरतेचा ध्यास या मनाला लागला पाहिजे .... त्यासाठीच विद्या प्रसारक मंडळ आपल्या प्रत्येक कृतीतून, उपक्रमातून आशेच्या नव्या दिशा निर्माण करीत आले आहे. दिशाचे व्यासपीठ ही त्यासाठीच !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ८ / जुलै २००१ किंमत रु. २०/-

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डाऊश लँड - (जर्मनी) - लेखांक ३ | अजित पाटील | ३ |
| २) | '' वंदे - मातरम् '' | सुरेश देशपांडे | १५ |
| ३) | ''वाटेवरती वरती काचा गं ! | सौ. विशाखा देशपांडे | १९ |
| ४) | डॉट-केम-डॉट गॉन | वासुदेव देशपांडे | २१ |
| ५) | सिरॅमिक पॉटरी - एक व्यवसाय | सौ. अनुराधा देशपांडे | २३ |
| ६) | 'स्वामी : एक शोध' | ग्रंथपाल | २५ |
| ७) | गुंफण | श्रीमती अर्पणा काजोरकर | २७ |
| ८) | पुस्तकांच्या दुनियेतील मुसाफिरी | श्री. ल. टिळक | २८ |
| ९) | एक साधारण निबंध संग्रह | प्रा. मोहन पाठक | ३० |
| १०) | जैसे चित्त जयावरती | अरविन्द दोंडे | ३१ |
| ११) | कारगिल एक आढावा | अवधुत जोशी | ३४ |
| १२) | परिसर वार्ता | ग्रंथपाल | ३८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही

# डाऊश लँड - (जर्मनी)- लेखांक ३

*जर्मनीच्या प्रवासवर्णनाची लेखमाला सध्या दिशातून देत आहोत त्यातील हा तिसरा व शेवटचा लेख - संपादक*

ऑक्टोबर ते मार्च हा जर्मनीत हिवाळा तर एप्रिल ते सप्टेंबर हा उन्हाळा, हिवाळ्यात उणे पाच ते आठ डिग्री सेंटीग्रेड तर उन्हाळ्यात काही भागात जास्तीत जास्त बत्तीस डिग्री सेंटीग्रेड इतक तापमान असतं.

बरेच महत्त्वाचे उद्योगधंदे जर्मन सरकार स्वतःच चालवतं. लुफ्तानसा ही विमान कंपनी, डाऊशवाहन ही रेल्वे कंपनी तसंच टेलिफोन, पोस्ट सेवा इ. मुलभूत उद्योग जर्मन सरकार चालवतं. सरकारी असून देखील ग्राहकांच्या सोयी-गैरसोयी, आवड-निवड, यांची काळजी घेतली जाते. विकासासाठी खाजगीकरणाला पर्याय नाही ही समजूत जर्मनीत भ्रम ठरते. कलकत्त्याला केवळ सरकारी कार्यालयातच नव्हे तर परदेशी कंपन्यांच्या ऑफिस मधले बाबू भर दुपारी खुर्चीत बसल्या बसल्या पेंगताना मी पाहिलेत. खाजगीकरण हवे अथवा नको हा प्रश्न दुय्यम आहे. आपण भारतीयांनी प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे. मुंबईतल्या बेस्टची सेवा सरकारी असून देखील दिल्लीतल्या रेडलाईन, ग्रीनलाईन यासारख्या खाजगी बस सेवांच्या तुलनेत फारच उजवी आहे.

मार्केटिंगच्या व्यवसायात असल्यामुळे रोज नवीन पत्ते शोधणं हे एक कामच असतं. प्रत्येक ठिकाणची योग्य भौगोलिक माहिती, हवामानाचा अंदाज घ्यावा लागतो, तरच 'सेल्स कॉल' योग्य प्रकारे प्लॅन करता येतात. आणि कमीत कमी वेळात जास्तीत जास्त काम करता येतं. विशेषतः परदेश दौऱ्यात ही बाब फारच महत्त्वाची ठरते कारण मी काढलेल्या हिशेबाप्रमाणे एका कस्टमरच्या मिटिंगसाठी साधारणतः दहा हजार रुपये खर्च होतात. शिवाय युरोपियन लोकांची धारणा 'Dishonouring an appointment is dishonouring a person' अशी असते वेळेबाबत ते फारच काटेकोर व काटकसरी असतात. भारतातून निघण्याआधी बराच काळ परदेशी कस्टमरशी बराच पत्रव्यवहार होतो. त्यातून त्यांना स्वारस्य निर्माण झालं तरच त्यांच्या भेटीसाठी वेळ मिळते. त्यांनी दिलेली वेळ तंतोतंत पाळावी लागते. जर्मन लोकांची भेट घेण्यसाठी निदान चार आठवडे आधी वेळ मागावी लागते. भारतात आम्ही करतो त्या प्रमाणं त्या गावात पोहचल्यावर फोन करुन वेळ मिळत नाही. भारतीयांना युरोपियन पद्धतीचा अवलंब करणं बऱ्याच वेळा जड जातं. त्यातून संपूर्ण भारताचेचं नाव खराब होत.

**सेल्फ ड्रिव्हन कार** : भारतात बंगलोर, दिल्ली, मद्रास अशा शहरांमध्ये फिरताना मी 'हर्टस' या कार रेंटल कंपनीची गाडी 'सेल्फ ड्रीव्हन' तत्त्वावर घेऊन स्वतः चालवत असे. सातएकशे रुपये दिले की नवी कोरी मारुती. पेट्रोल मात्र आपलं. मग आपण मनाचे राजे. ड्रायव्हरचा देखील अडथळा होत नाही. स्वतः गाडी चालवल्यामुळे रस्ते तोंडपाठ होतात. आणि काम भराभर होतात. युरोपमध्ये मात्र आपल्याला ड्रायव्हिंग करणं अतिशय अवघड. अपवाद फक्त ब्रिटनचा. संपूर्ण युरोपात गाड्या 'लेफ्ट हॅंड ड्राईव्ह' असतात तर रस्त्याच्या उजव्या बाजूनं त्या चालवाव्या लागतात. या गोष्टी भारताच्या बरोबर उलट्या आहेत. त्यामुळं कितीही अवधान ठेवलं तरी आपण गोंधळतोच. विशेषतः रस्त्यावर डावीकडे वळताना मजा येते आपल्याला भारतात 'फ्री लेफ्टची' सवय असते त्यामुळं डावीकडे वळताना आपला सिग्नलकडे कानाडोळा होतो. ''डाव्या विचारसरणीला युरोपात चांगलाच मार बसतो.''

जर्मनीला जाताना मी बराच भौगोलिक अभ्यास केला होता. मुंबईच्या कफपरेडमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या तिसाव्या मजल्यावर असलेल्या लायब्ररीत तसंच तिथूनच जवळ असलेल्या इंडो जर्मन चेंबर ऑफ कॉमर्स च्या

लायब्ररीत बराच वेळ घालवून महत्त्वाची माहिती गोळा केली. आपल्याकडं ज्या प्रमाणं पीनकोड नंबर असतो तसा 'पोस्ट फॅच' नंबर असतो. प्रत्येक पत्त्यावर हा नंबर घालावाच लागतो. मी पोस्टफॅच नंबर नुसार जर्मनी आणि फ्रान्सचा नकाशा मिळवला होता. त्याच्या सहाय्यानं कोणत्याही पत्त्याविषयी बरीचशी माहिती मिळू शकत होती. त्या नकाशात संपूर्ण जर्मनी पोस्टफॅचच्या स्वरुपात दाखवली होती.

**जर्मन पत्ता** : संपूर्ण जर्मनी शून्य ते नऊ अशा विभागांमध्ये विभागून त्याप्रमाणे पोस्ट फॅच नंबर दिलेले आहेत. उदाहरणार्थ ० म्हणजे पूर्वाश्रमीचा पूर्व जर्मन, १ म्हणजे बर्लिन, २ -हॅमबर्ग, ३-हॅनोव्हर, ४-डुझेलडॉर्फ, ५-बॉन, ६-फ्रॅंकफर्ट, ७-स्टुटगर्ट, ८-म्युनिक, ९-न्युरेनबर्ग. कोणताही पोस्टफॅच नंबर चार आकडी असतो. पहिला आकडा वरती दिल्याप्रमाणे प्रमुख शहर अथवा परिसर दर्शवतो. प्रत्येक परिसर हा परत दहा उपविभागात विभागला गेलाय. त्या उपविभागांनाही शून्य ते नऊ आकडे दिलेले असतात. अशा प्रकारे शेवटचे दोन आकडे त्या शहरातला विभाग व गल्ली दाखवतात. त्यामुळं पत्त्यावरून ठिकाण शोधणं सोपं जातं.

कोणत्याही ठिकाणापासून वीस-एक किलोमीटरच्या आत रेल्वे स्टेशन असतेच. कोणती ट्रेन कधी पकडायची याची इत्थंभूत माहिती DB ट्रेन कंपनी कॉम्प्युटर प्रिंटाऊट देऊन तुम्हाला समजावून सांगते. मग त्या स्टेशनवर उतरुन टॅक्सी केल्यास तुम्हास इच्छित स्थळी पोहचता येते. टॅक्सीवाल्यास पोस्टफॅचमधला तिसरा आणि चौथा आकडा माहीत असल्यामुळे तो फक्त पत्ता बघून काहीही न बोलता तुम्हाला इच्छित स्थळी नेऊन सोडतो. अजित पाटील, D-8621 इतक्या पत्त्यावर तुम्ही एखाद्या माणसाला शोधू शकता. जर्मन पत्त्याहून छोटा पत्ता फक्त इमेल ॲड्रेसच असू शकेल. या पार्श्वभूमीवर आमच्या भारतीय पत्त्याचे जर्मनांना फार आश्चर्य वाटत असेल. केवळ पिनकोड देऊन चालत नाही तर मुक्काम, पोस्ट, तालुका, जिल्हा, राज्य हेही लिहावं लागतच. गव्हर्मेंट गेस्ट हाऊसच्या मागे, पत्री पुलाच्या अलिकडे, पाण्याच्या टाकी खाली, पिंकी स्टुडिओच्या बोळात इतक्या खोलवर पत्ते का लिहावे लागतात. हा एक संशोधनाचाच विषय आहे. 'मार्शल' या अमेरिकन सेना प्रमुखाच्या आराखड्यानुसार जर्मनीची पुनर्बांधणी झाली. त्यामुळं या सर्व पद्धती अमेरिकेप्रमाणेच आहेत. तरीही अमेरिकेचं अनुकरण न करता जर्मनीनं भारताप्रमाणे दशमान पद्धती अवलंबलेली आहे. त्यामुळं किलो, किलोमीटर, लीटर, मीटर या स्वरूपात मोजमापं घेतली जातात.

**माध्यमाचा प्रश्न**: इंग्रजी शिवाय प्रगती अशक्य अशी खूणगाठ बहुतेक सर्व भारतीयांनी बांधली आहे. त्यामुळंच इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे 'भाव' कडाडले आहेत. मातृभाषेतच शिक्षण झालं पाहिजे असं ओरडून सांगणाऱ्याचा आवाज बसला तरी पालकांवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. लांब कशाला, माझ्या मुलीन, सुप्रियानं, मराठी माध्यमातूनच शिक्षण घ्यावं अशी माझी आणि मराठीचे प्राध्यापक असलेल्या माझ्या वडिलांची इच्छा होती. पण भारतात रहायचं असेल आणि जगात प्रगती करायची असेल तर इंग्रजीला पर्याय नाही अशी ठाम भावना माझ्या बायकोची होती. तिला अमेरिकेत रहाणाऱ्या माझ्या धाकट्या भावानं भक्कम पाठिंबा दिल्यामुळं, तसंच ठाण्यातल्या प्रतिष्ठित मराठी माध्यमाच्या शाळेनं केवळ शाळेजवळच्या परिसरात रहात नाही ह्या 'दर्शनी' सबबी खाली प्रवेश नाकारल्यामुळं तिला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घ्यायला पर्याय राहिला नाही. जपान, जर्मनी आणि फ्रान्स या तीनही राष्ट्रांनी इंग्रजीचा गंध नसताना सर्वच क्षेत्रात कशी प्रगती केली याचा आढावा आपण सर्वच भारतीयांनी घेण्याची तीव्र गरज आहे.

जर्मनीच्याच बाबतीत बोलायचं झालं तर इंग्रजीच्या नावानं फारच बोंब. तुम्हाला जर्मन येत नसेल तर जर्मनीत तुमचे हाल 'जर्मन शेफर्ड' सुद्धा खाणार नाही. फारतर फ्रॅंकफर्ट, हॅमबर्ग, अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरांतच

तुमचा टिकाव लागू शकेल. पण इतर बुहतेक शहरात आणि विशेषत: छोट्या गावात फारच हाल होतात. त्यातल्या त्यात एकाच गोष्टीचा आधार म्हणजे जर्मन बाराखडी साधारणत: इंग्रजी प्रमाणेच असल्यामुळं तुम्ही निदान पत्ता, दुकानांवरचे -रस्त्यांवरचे बोर्ड कसेबसे वाचू शकता. पण तरीही बराच फरक आहे. उदाहरणचं सांगायच झाल तर आम्ही राहिलो होतो त्या हॉटेलचा पत्ता त्यांनी इंग्रजीत विझिटींगकार्डवर असा छापला होता. Hotel AMBA, Aynulfstraβe 20, 80335, München आता वाचा बघू तुम्ही हा पत्ता. तुमची गाडी पहिल्यांना अडकेल ती β मध्ये. कारण हे इंग्रजी मूळाक्षर नाही. गणिताचे विद्यार्थी असाल तर तुम्ही याचा उच्चार 'बीटा' असा कराल. पण जर्मन डबल एस् ऐवजी β वापरतात. म्हणजे वास्तविक पत्त्यामध्ये Arnulfstrasse असं लिहायला हवं होतं. 'स्ट्रासे' म्हणजे रोड. परत तुमची गाडी अडेल ती ü इथं. आंतरराष्ट्रीय इंग्रजीत हेच ue असं लिहिल जात. पण जर्मन इंग्रजीला या गोष्टीच बंधन नाही. खरं तर हा शब्द इंग्रजीत Muenchen असा लिहिला पाहिजे. इतकच नाही तर या शब्दाचा उच्चार 'म्युनिक' असा होतो. ue, oe ऐवजी ü, ö याला जर्मन एवढे सरावले आहेत की त्यांच्या इंग्रजीत २६ पेक्षा जास्त मुळाक्षरे आहेत.

जर्मन शब्द सुद्धा चांगलेच लांबसडक असतात. उदाहरणार्थ हे शब्द वाचायचा प्रयत्न करा. Genschaftsbedingungen दुसरा Chomikallenverains - AGB अथवा Wdrozeniuowe आणि Przedsiebiorstwo. एका दमात हे शब्द उच्चारताना किती दम लागला? जर्मन येणाऱ्याला हे शब्द उच्चारायला सांगा म्हणजे तुम्ही किती भलतेच उच्चार केलेत लक्षात येईल. त्यामुळंच बुहतेक वेळा काही लिहून घेताना तुम्हाला जर्मन माणसाला सतत स्पेलिंगस् विचारावे लागतात. इतके की कितीही संयमी असला तरी तो तुमच्यावर वैतागलाच पाहिजे. त्यामुळं लिहिण्याचा प्रसंग आला की, मी कागद आणि पेन जर्मन माणसापुढे भरत असे. त्यालाही बाळबोध प्रमाणे स्पेलिंग सांगण्यापेक्षा लिहिण परवडे. सगळ्यात भयंकर प्रसंग म्हणजे अनोळखी जर्मन माणसाशी प्रथमच फोनवर चर्चा करण. जगात फिरलेला आणि फर्डा इंग्रजी असलेला जर्मन वगळता दुसरा कोणीही काय बोलतोय ते तुमच्या डोक्यावरून जातं आणि तुम्ही काय बोलताय ते त्यालाही समजत नाही. सन टि.व्ही. चॅनलवर गाजलेला तमिळ पिक्चर बघताना जसं आपण अधेमधे येणाऱ्या इंग्रजी शब्दांवरून आराखडे बांधत असतो. तसाच प्रकार मधून मधून काही शब्द समजतात त्यावरून तुमचं संभाषण चालू रहातं एवढंच.

**भाषेचे बोलीरुप** : इंग्रजी बोलण्याबाबत जशी आपण जर्मन आणि फ्रेंचांची तक्रार करतो तशीच तेही आपल्या विषयी करतात. त्यांच्या मते आपण फारच वेगात बोलतो. शिवाय आपल्या इंग्रजी उच्चांरावर मातृभाषेचे संस्कार झालेले असतात. बहुतेक सर्व भारतीय भाषेत लोक वेगात बोलतात. त्यामुळेच इंग्रजीही भरभर बोलण्याची आपल्याला सवय लागते. माझ्या डायरेक्टरला 'मुव्हर्स अँड शेकर्स' मधल्या 'शेखर-सुमन' प्रमाणं खूपच भरभर बोलायची खोड. त्यात त्याचा आवाज कायमच बसल्यासारखा. त्यामुळं बऱ्याच मिटिंगमधे मला त्याचं गुजराथी इंग्रजी आणि जर्मन इंग्रजी असं भाषांतर करणाऱ्या दुभाषाचं काम करावं लागे. त्यांनी जर फोन केला तर भेटीची वेळ मिळणं यामुळेचं मुष्कील जाई. आपण मुळातच भरभर इंग्रजी बोलतो त्यात भर पडते ती जेव्हा आपण I.S.D फोनवरून परदेशी लोकांशी बोलतो तेव्हा. आपण बोलणाऱ्या वेगाची स्पर्धा गरागर फिरणाऱ्या S.T.D. च्या मीटरशी होत असते. भारतातून आलेल्या फोनवर संभाषण करणं हा युरोपियनांना रोमांचकारी अनुभव ठरतो. तामिळनाडूच्या खेड्यात गेल्यावर तामीळ वाचून तुमचे जे हाल होतील, तुम्हाला जो अनुभव येईल, जवळपास तसाच अनुभव मला जर्मन खेड्यात येई.

नितीमत्ता, व्यसनं यांच्या संकल्पना वेगवेगळ्या भूप्रदेशात आणि समाजात वेगवेगळ्या असतात. आमच्या लहानपणी माझ्या पप्पांचे खास मित्र पोलीस इन्सपेक्टर होते.

त्यांच्याकडे आम्ही नेहमी जात असू. त्यांची बदली महाराष्ट्रात वेगवेगळ्या तालुक्यात होत असे. तालुक्याच्या गावी, इन्स्पेक्टर म्हणजे राजाच असे. अशा राजाची मुले शाळेत आणि मित्रमंडळीत महाराजाच असत. शाळेत असतानाच ते मित्रांना घेऊन हॉटेलात पार्ट्या करीत. आम्ही मराठीच्या प्राध्यापकाची मुलं, आम्हाला ही गोष्ट 'भयंकर' वाटत असे. अशा पार्ट्यांसाठी त्यांची आई त्यांना खळखळ न करता पैसे देत असे. आणि ही बाब कौतुकवजा तक्रारीनं लोकांना सांगत असे. पण आम्ही मुलं पत्त्यांमधे पाच-तीन-दोन अथवा भिकार-सावकार खेळायला लागलो की त्यांच डोकं फिरत असे. तावातावानं पत्ते हिसकावून घेत ती म्हणत असे ' तुमच्या बापानं तरी पत्ते खेळले का रे कधी ?' नितीमत्तेबद्दल ? फौजदारणिबाईंची ही संकल्पना.

माझं आजोळ, चारएक हजार वस्तीचं, सातारा जिल्ह्यातलं खेडं. प्रत्येक उन्हाळ्यात दोन महिने आम्ही या वीजही नसलेल्या खेड्यात आजी आजोबांबरोबर रहात असू. शहाण्णव कुळी खानदानी भोसल्यांचं हे गाव 'पदर' जुळल्या शिवाय लग्न संबंध होत नसत. आपल्या खानदानी पणाला जीवापाड जपणाऱ्या या खेड्यात एका मिसरूड फुटलेल्या मुलापासून सतरा अठरा वर्षांच्या मुलीला दिवस गेले. गावात बोभाटा झाला. 'भावकी' मधे असे अपवित्र संबंध पहिल्यांदाच झाले होते. मुलगा त्याच मुलीशी लग्न करतो म्हणून बसला. हे तर महापाप. त्याच पोरा पोरीच्या आईवडीलांची सर्व पंचक्रोशीत छी थू झाली. या बदनामी पेक्षा मरण परवडलं अशा यातना त्यांना झाल्या. तर चारपाच पिढ्यापूर्वी असलेलं नातं आपल्या प्रेमाआड का येतं हे त्या पोरांना समजत नव्हतं. नितीमत्तेची ही संकल्पना महाराष्ट्राच्या खेड्यात नाही तर जर्मनीच्या जुन्या पिढीला आपली मुलं मुली लग्न करत नाहीत, नुसतेच मित्र मैत्रिणी प्रमाणे एकत्र रहातात. मुलं होऊ देणं टाळतात याची चिंता लागलीय. तर अमेरिकेत 'गे' 'लेसबियन' संस्कृती डोकं वर काढतेय. आपला मुलगा मुलीशीच लग्न करेल ना याची चिंता अमेरीकन आईबापाला. मुलीनं मुलाशीच लग्न करावं एवढी त्यांची माफक अपेक्षा.

**दारू न पिणारे पाटील** : लहानपणी खेड्यापाड्यात फिरताना माझ्या आजोबांचे काही मित्र चहा पित नसत हे मी बघितलेलं. चहा पिणं म्हणजे व्यसन ही त्यांची संकल्पना. मला त्याचं फार आश्चर्य वाटे. माझ्या बाबतीतही अशीच भावना माझ्या ब्रिटिश, जर्मन कस्टमर च्या मनात असेल. जेवायला गेलं की वाईन किंवा बीयर घेणं अथवा दोन चार 'पेग' मारणं म्हणजे व्यसन असू शकतं हे ऐकून त्यांना धक्का बसत असे. मी अल्कोहोल का घेत नाही हे मी एकाही युरोपियनाला समजावून सांगू शकलो नाही. आपल्याकडं 'मी चहा पीत नाही' अशी बढाई जर कुणी मारायला लागला तर या मूर्खांच्या तोंडी लागायला नको असं आपण म्हणू, तशीच भावना बीयर आणि वाईन बद्दल युरोपियनांच्या मनात आपल्या विषयी होण्याची शक्यता असते.

माझा एक मित्र माझी ओळख 'दारू न पिणारे पाटील' अशी करून देत असे. जर्मनीत जेव्हा मी एका कस्टमरला सांगितली की मीच काय पण माझ्या मागच्या पिढ्यात माझ्या वडिलांनी, आजोबांनी कधीही दारू प्यायली नाही. तेव्हा त्याला जगातलं आठवं आश्चर्य वाटलं. आणि अमेरिकेत रहाणारा माझा धाकटा भाऊही दारूला स्पर्श करत नाही अथवा 'मीट' खात नाही हे सांगितल्यावर त्याला भोवळच येणं बाकी होतं. त्याच्या ऑफिसमधे प्रत्येकाची ओळख करून देताना इसापनितीतली गोष्ट सांगितल्या प्रमाणे आमच्या 'टिटोलर' खानदाना विषयी सांगत असे. आइन्स्टाईनच्या रिलेटिव्हिटीचा सिद्धांत जीवन विषयक मूल्यांनाही लागू होऊ शकतो हे मला नव्यानंच कळलं.

मांस, बाई आणि बाटली युरोपियन लोकांना अंगवळणीच पडलय. ब्रिटिश हे त्यातल्या त्यात थोडेसे सौम्य. सेक्सविषयी ते उघड उघड चवीनं बोलत नाहीत. हॅम्बर्ग मधल्या 'अॅपलहन्स' नामक कंपनीच्या डायरेक्टरनं मला गप्पा मारताना बरच काही सांगितले. तिथं कोणत्या भागात कशा पोरी मिळतात याच रसभरीत वर्णन त्यानं

चवीनं सांगितल. शिवाय मला सुचवलं की 'स्टाईनहॅम' मध्ये जाऊ नका. तिथं फसवाफसवी आहे ? 'रिवावा मधे जा'. मला धक्काच बसला. आपल्याकडे आलेल्या परदेशी पाहुण्याला आपण रहायच हॉटेल, जेवायचं रेस्टॉरंट, शॉपिंगची दुकानं फार तर चांगले 'बार' सुचवू. पण त्यांच हे सुचवणं आपल्याला सुचणार नाही.

**स्पेलिंगचा घोळ** : अल्फ्रेड झीलकडे जेव्हा मिटींगला जायला निघालो तेव्हा म्युनिक स्टेशनवर चौकशी केली असता 'लॅव्हिनगॉन' नावाचं गावच जर्मनीत नाही असं D.B. च्या रेल्वे कर्मचाऱ्यानं मला सांगितल. त्याही उपर तो म्हणाला हे गाव रशियात आहे, आणि तेही चक्क कॉम्प्युटरवर बघून. मी आश्चर्य व्यक्त केल्यावर त्यानं कॉम्प्युटरचा मॉनीटरच माझ्या दिशेला फिरवला. मी परत अल्फ्रेडला फोन केला तेव्हा 'तानियाला' माझी अडचण समजेना. अखेर बऱ्याच चर्चेनंतर माझ्या लक्षात आलं की माझ्याकडं गावाचं स्पेलिंग चुकीच होतं. त्यामुळं घोटाळा होत होता आणि चुकीचं स्पेलिंग असलेलं खरोखरचं गाव रशियात होतं. आणखीन घोटाळा व्हायला नको म्हणून म्युनिक पासून लॅव्हिनगॉनला कसं पोहचायचं हे मी तिला विचारलं. तिनं मला सांगितल्याप्रमाणे मला 'क्विन्सबर्ग' उतरुन टॅक्सीन वीस एक मिनिटं प्रवास करावा लागणार होता.

आता 'क्विन्सबर्ग' ला कसं पोहचायच हे विचारण्यासाठी मी परत चौकशीच्या खिडकीवर गेलो. परत घोटाळा नको म्हणून मी 'Queensburg' असं लिहून त्याच्याकडे चिठ्ठी दिली. कॉम्प्युटरवर बघून तो परत म्हणाला हे गाव जर्मनीत नाही. मी पुरता गोंधळलो. थोडा विचार केला, माझ्याकडे तानियानं दिलेल लॅव्हिनगॉनच बरोबर असलेलं स्पेलिंग मी त्याला लिहून दिलं. आता मात्र त्याच्या कॉम्प्युटरने होकारार्थी उत्तर दिलं. त्यानं, लॅव्हिनगॉनला जाण्यासाठी किती वाजता कुठून ट्रेन आहेत हे दर्शविणारा एक कॉम्प्युटर प्रिंटाऊटच माझ्या हातात दिला. त्याच्या कॉम्प्युटर प्रमाणे मला म्युनिकहून फ्रँकफर्टला जाणारी ICE ट्रेन पकडून 'उल्म'ला उतरुन 'Günzburg' ला जायचं होतं. तेथून पुढं मला थेट लॅव्हिनगॉनला जाणारी ट्रेन मिळणार होती. अशा प्रकारे 'तानिया' आणि कॉम्प्युटरन मला परस्पर विरोधी दिशा दाखवून माझी दिशाभूल केली. मी नकाशा काढला. मग मला दिसलं की म्युनिकवरुन स्टुटगार्डकडे जाताना आधी ऑसबर्ग येत होतं. आणि तसच पुढे गेलं तर उल्म येत होतं. याचा अर्थ तानिया मला आधी येणाऱ्या ऑसबर्गला उतरायला सांगत होती तर कॉम्प्युटर ऑसबर्ग नंतरच्या उल्म या स्टेशनला उतरायला सांगत होता. कोडं इथपर्यंत तरी सुटल. पण पुढं? मी ठरवलं कॉम्प्युटरचं ऐकायच. मी ट्रेन धरली आणि उल्मला उतरलो. कनेक्टिंग ट्रेन काही मिनिटांनी होती आणि ती शेजारच्याच प्लॅटफॉर्मवर होती. मी तिथं थांबलो. माझा फर्स्ट क्लासचा युरो पास होता. त्यामुळं फारच सोय होती. ट्रेन आल्यावर मी बोर्ड वाचला तर ती म्युनिकला जाणारी ट्रेन होती. आता मी पुरता गोंधळलो म्युनिकवरुनच मी आलोय आणि आता परत त्याच दिशेला? पण मी गाडीत चढलो. दहाच मिनिटांत 'Günzburg' स्टेशन आलं. मी उतरलो. पण ट्रेनला पंधरा मिनिटं उशीर झाल्यानं माझी पुढची ट्रेन हुकली. मग मी परत गोंधळलो. आता कसं जायच.

इतक्यात एक लेडी गार्ड दिसली. तिला मी गाठलं आणि सर्व प्रकार सविस्तर सांगितला. ती हसायला लागली. मला कोडं उलगडेना. मग तिनं सांगितल की 'Günzburg' चा उच्चार क्वीन्सबर्ग असा करतात. मी मात्र गुंजबर्ग असा उच्चार करीत होतो. आणि तानियान जेव्हा मला क्वीन्सबर्ग सांगितल तेव्हा मी स्पेलिंग 'Queensburg' असं लिहिलेल होतं. त्यामुळेच मी जेव्हा प्रवास सुरु करण्यापूर्वी Computer वाल्याला 'Queensburg' लिहून दिलं तेव्हा त्यानी असं गावच नाही म्हणून सांगितल. थोडक्यात कॉम्प्युटरनं छापलेलं 'Günzburg' म्हणजेच तानियाच सांगितलेल क्वीन्सबर्ग होतं. माझा तर्क 'गुंजबर' देखील बरोबर नव्हता. जर्मन उच्चारांनी चांगलाच दणका दिला होता. मग याच गार्डन मला सांगितल की Günzburg'हे

गाव म्युनिक-ऑसबर्ग -उल्म मार्गावर ऑसबर्ग आणि उल्मच्या मधे आहे. पण ज्या वेळेला मी म्युनिकवरून निघालो तेव्हा लगेच असणारी ट्रेन Intercity Express (ICI) म्हणजे (सुपर फास्ट) होती ती 'Günzburg' ला थांबत नाही. त्यामुळं मला उल्मला जाऊन तेथून परत उलटं यावं लागलं. कॉम्प्युटरच शेवटी! नवीन माणसाला फास्ट ट्रेननी जाऊन परत उलटं यायला सांगण्यापेक्षा पुढची एखादी स्लो ट्रेन सुचवावी, हे कॉम्प्युटरला कसे सुचणार ? आणि कॉम्प्युटर फक्त तावडतोब असणाऱ्या गाडीनं कसं जायचं याचाच प्रिंट आऊट देतो. त्यामुळ आमची वरात निघाली. 'Günzburg' वरून प्रत्येक तासानंतरच लॅन्हिनगॉनला Regional Express (RE) ट्रेन आहे. म्हणून तानियान मला 'Günzburg' वरून टॅक्सीन यायला सांगितल. दररोज असे नवे गोंधळ होत असत.

### डोकं लढवलं

असाच प्रकार झाला तो 'टेम्पलस्वेज' या खेड्यामधे एका कंपनीत जाताना मी हॅमवर्गावरून निघालो वाटेत Dortmund आणि Duisburg या स्टेशनामध्ये ट्रेन बदलली आणि Krefeld ला जायला Regional Train पकडली. आपल्याकडे ज्या प्रमाणे पहिल्यांदाच मुंबईत आलेला माणूस मुंबई व्ही.टी.(C.S.T.), मुंबई सेंट्रल अशा नावानं गोंधळतो तसा प्रकार झाला. क्रेफेल्डला जोडनाव असलेली चार स्टेशन आली कस्टमरनं तर मला फक्त क्रेफेल्ड सांगितलेलं त्याचं जोडनाव सांगितल नव्हतं आणि नुसतं क्रेफेल्ड तर कुठच नव्हतं. अखेर Krefeld-HBF ला उतरलो कारण मला माहीत होतं HBF म्हणजे मुख्य स्टेशन आणि तर्क लढवला की ज्याअर्थी कस्टमरनी फक्त Krefeld सांगितल त्या अर्थी मुख्य स्टेशनच असणार. तिथून मला Tonisvorst ला जाऊन मग Tempelesuej ला जायचं होतं. चौकशी करायला लागलो. अर्धा तास गेला पण इंग्रजी येणारा धड एकही जण भेटेना.

मग डोकं चमकलं. जुन्या पिढीच्या लोकांची इंग्रजीच्या नावानं बोंब असणार. कारण त्यांनी शाळेत ती भाषा शिकली नाही म्हणून शाळेत जाणाऱ्या नववी दहावीच्या मुलाला पकडायचं ठरवलं. पाचवी पासून इंग्रजी सुरु झाल्यामुळं तो मला नक्कीच मदत करु शकेल. हा माझा तर्क. अखेर गोळी बरोबर लागली. अफ्रिकन लोकांप्रमाणे कुरळे केस असलेली पण उजळ रंगाच्या एका शाळकरी मुलीला मी गाठलं. तिला मी काय बोलतोय ते समजलं. पण उत्तर देताना ती चुकायला लागली. अखेर बराच प्रयत्न केल्यावर मला कळलं की Tonisvorst ला जायला ट्रेन नव्हती. मला ट्रामन जावं लागणार होतं. समोरच ट्रामस्टेशन होत.

तिथं जाऊन उभा राहिलो. जर्मनीत बऱ्याच शहरात ट्राम व्यवस्थित चालू आहेत. तिथं शाळेतला दुसरा मुलगा दिसला त्यानं तोडक्या मोडक्या Yes, No मधे खुणवून मला सांगितल की मी उलट्या दिशेने जाणाऱ्या ट्रामच्या रांगेत उभा होतो. मला जायचं होतं ती ट्राम जवळच असलेल्या दुसऱ्या स्टॅंडवरून जात होती. मी पळत तिकडं गेलो. ट्रामचे नंबर मद्रासच्या बस प्रमाणे होते. 20C, 20D, 20, 20G वगैरे. मुश्किलनं एक ट्राम नंबर शोधून काढला आणि आत बसलो. दोन लांबलचक डब्यांची ट्राम होती. दर तीन मिनिटाला थांबत होती. लोक चढत होते उतरत होते. तिकिट का काढत नव्हते देव जाणे. मी पण कंडक्टरची वाट पहात होतो एवढ्यात एकानं मला ढोसून सांगितल की माझा स्टॉप आला. मला नाईलाजान तिकिट न काढताच उतराव लागलं.

जवळ खेड्यात मी होतो. मला एक आश्चर्यकारक गोष्ट जाणवली. बायकांच्या हातात पांढऱ्या कापडी पिशव्या होत्या. माझ्या लहानपणी आजोळी दर सोमवारी बाजार भरायचा. त्या बाजारात येणाऱ्या बायकांच्या हातात कापडी पिशव्या असायच्या. तशाच जर्मन बायकांच्या हातात बघून मला धक्का बसला. कारण अमेरिकेत, ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड मधेच काय पण मुंबईत-पुण्यात फिरताना मला कुठंही असल्या पिशव्या दिसल्या नव्हत्या. अमेरिकेत फिरताना न्यूजर्सीत भारतीय 'चिऊताई' उडताना बघितल्यावर जो

आनंद झाला होता तसाच आनंद इथं कापडी पिशव्या बघून झाला. आता मुंबईत प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी आली आहे. प्लॅस्टिक पिशव्यांचा पर्यावरणावर किती विपरित परिणाम होतो हे फक्त जर्मनी आणि भारतातल्या खेडुतांनाच कळलं आहे हेच खरं.

**लोकसंख्या - निरीक्षणे** : जर्मनीतली लोकसंख्या सर्वत्र समप्रमाणात विखुरल्याचे त्यांना बरेच फायदे आहेत. त्यामुळंच हॅमबर्ग, सारखं बंदर अथवा बर्लिनची राजधानी आणि फ्रँकफर्टची आर्थिक राजधानी वगळता जर्मनीत सर्व साधारणत: जमिनीचे भाव सारखे आहेत. पण गमतीचा भाग म्हणजे घरासाठी जमिनीचे भाव उद्योगाला लागणाऱ्या जमिनीच्या भावाच्या तिपटीने महाग आहेत. यावरूनच उद्योग-धंदे काढायला सरकार कसे प्रोत्साहन देते ते कळेल. उदा. ऑसबर्ग भागात कारखान्याला लागणारी जमीन 100DM प्रति चौरस फूट मिळते; तर हाच भाव घर बांधणीसाठी लागणाऱ्या प्लॉटला 300DM प्रति चौरस फूट इतका आहे. आपल्याकडे याच्या नेमकी उलटी परिस्थिती. उद्योग आणि उद्योगपती यांच्याकडे लुटारू म्हणून पहाण्याची प्रवृत्ती अजून आहेच. अर्थात याला हे तरन बनिया, उद्योगपती कारणीभूत आहेत.

जर्मनीत दोन गोष्टी मजेशीर वाटल्या. कोणत्याही भारतीय रेस्टॉरंटमधे जा कोणतीही भाजी घ्या बरोबर एक प्लेट भात फ्री मिळतो. त्यामुळं वेगळा भात ऑर्डर करावा लागत नाही. तोच प्रकार बस बाबत तुम्हाला जिथं जायचंय त्या 'झोन' चं लोकल रेल्वेचं तिकीट काढलंत तर त्या झोनमध्ये बस प्रवास मोफत असतो. परत येताना काढलेलं तिकीट ट्रेनलाही चालतं. या उलट आमच्या मुंबईत सेंट्रल रेल्वेच्या लोकलच दादर पर्यंत तिकीट असेल आणि दादरला वेस्टर्न रेल्वेच्या ब्रीजवरून पश्चिमेला उतरायला लागलात आणि टी.सी. नं अडवलं तर दंड. एकाच स्टेशनच्या पूर्वेला आणि पश्चिमेला उतरायला वेगवेगळी तिकिटं लागतात असं दादर हे जगातलं एकमेव रेल्वे स्टेशन असेल!

**इतर देशीय कमीच** : जर्मनीमध्ये भारतीय तसे औषधापुरतेच दिसतात. कम्युनिस्ट राजवटीत पूर्व जर्मनीवरून लोक पश्चिम जर्मनीत पळून येत. त्यांना राजाश्रय देणं महत्त्वाचं होतं. त्यासाठी पश्चिम जर्मनीत एक कायदा पास करून ज्या कोणाला त्यांच्या मातृभूमीत त्यांच्या धर्मामुळं अथवा राजकीय पक्षामुळं जगणं अशक्य आहे त्यांना राजाश्रय देण्याचा निर्णय घेतला होता. या कायद्याचा फायदा उठवून काही अफगाणी, पाकिस्तानी आणि शीख जर्मनीत घुसले. रशियानं अफगाणिस्तानमधे प्रवेश केला त्यावेळी बरेच अफगाणी जर्मनीत आले. पाकिस्तानातून ठराविक वंशाचे विशेषत: अहमद मुसलमान त्यांच्यावर जातीय दंगलीत झालेल्या अत्याचारांचं निमित्त साधून आले तर इंदिरा गांधींच्या खुनानंतर शीखांविरुद्ध उसळलेल्या दंगलीनंतर काही शीख जर्मनीमधे गेले. असे काही अपवाद वगळता जर्मनीत जाऊन स्थायिक होणं फारच कठीण आहे.

त्याबाबतीत अमेरिका, कॅनडा, आणि ऑस्ट्रेलिया फारच उदारमतवादी. ब्रिटनही ठीक. पण जर्मनी, हॉलंड वगैरे देशात स्थलांतर करणं फारच अवघड. स्थलांतर लांबच राहिलं पण टूरिस्ट म्हणून व्हिसा देखील दहा-बारा दिवसांच्यावर मिळत नाही. अनेक शंका-कुशंका उपस्थित केल्या जातात. आम्ही दुसऱ्या वेळेला जर्मनीला जाताना देखील आम्हाला याचा 'प्रसाद' मिळाला. बिझनेस व्हिसा असून, आमच्या जर्मन कस्टमरनी निमंत्रण देऊनही मुंबईतल्या जर्मन कौनसिल मधल्या व्हिसा देणाऱ्या बाईंचं समाधान झालं नव्हतं. तिनं अजून काही कागदपत्र घेऊन आम्हाला दुसऱ्या दिवशी परत बोलावलं. अमेरिका, ब्रिटन इतकंच काय पण हॉलंड आणि खुद्द जर्मनीत आम्ही मागच्याच वर्षी जाऊन आलो होतो, तरी हा छळ का? असं आम्हाला वाटलं. ॲम्बेसीमधे व्हिसा देणारे अधिकारी मुंबईकरच दिसत होते. बाई फारच उर्मट होती. आपण फारच दमाने इतबारे नोकरी करतो असं दाखविण्याचा तिचा केविलवाणा प्रयत्न होता. याच्या नादात ती कॉमनसेन्स देखील वापरायला तयार नव्हती. दुसऱ्या दिवशी जावंच लागणार होतं. 'अडला नारायण.....'पण आमच्या

नशिबानं दुसऱ्या दिवशी ती बाई रजेवर होती. आणि दुसऱ्या एका शहाण्या ऑफिसरनं मोजके पण नेमके प्रश्न विचारून आम्हाला दोन महिन्याचा मल्टि एन्ट्री, बिझनेस व्हिसा दिला.

असाच आडमुठा भारतीय हॅमबर्ग मध्येही भेटला. तिथल्या भारतीय रेस्टॉरंटमधे गेलो. जेवताना प्यायला पाणी मागितलं. त्यानं सरळ सांगितल की त्यांच्या रेस्टॉरंटमधे ग्लासातून पाणी देण्यावर बंदी आहे. बाहेरुन आलेल्या पाहुण्याला आधी पाणी विचारण्याचा शिष्टाचार असलेल्या भारतातल्या माणसाच्या हॉटेलात पाण्यावर बंदी म्हणजे काय? नंतर लक्षात आलं की ड्रींक्स, मिनरल वॉटर, कोका-कोला आदि पेयांचा रेस्टॉरंट मधला खप वाढवण्यासाठी अशी पॉलिसी. शेणात पडलेली गिन्नी उचलण्याची ही प्रवृत्ती. या उलट आमच्या ठाण्यातली रेस्टॉरंट आठवली. ती तुमचं स्वागत करतील आणि तुमची भाजी पॅक होईपर्यंत तुम्हाला बसवून उंच काचेच्या ग्लासात लिंबू सरबत देतील. रेस्टॉरंट म्हणजे आदरतिथ्य याची जाण त्यांना आहे. त्यामुळंच तिथं लोक गर्दी करतात.

**जर्मन शाळा :** जर्मनीमधे फिरताना गणवेषातील शाळेतील मुलं दिसली नाहीत. चौकशीअंती कळलं की बहुतेक शाळांमधे गणवेष नसतो. शिक्षण पद्धती आपल्या सारखी दहा अधिक दोन अशी आहे. सहाव्या वर्षी मुलं पहिलीमधे जातात. साधारणतः पाचवीत इंग्रजी विषय चालू होतो. उशीरा शिकवायला सुरुवात केल्यामुळं होणाऱ्या तोट्याची चर्चा जर्मनीतही चालू आहे. पण इंग्रजीला राजमान्यता देऊन पहिली पासून तो विषय ठेवणं त्यांच्या ताठ बाण्याला ठेच पोहोचवत आहे.

त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचं खरंच कौतुक करावसं वाटत आहे. पहिली पासून इंग्रजी विषय शाळेत शिकवला जाण्याविषयी घेतलेला आपल्या शासनाचा निर्णय स्तुत्य आहे. अर्थात यात अनंत अडचणी आहेत या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन, पालक आणि शिक्षक अजून तयार नाहीत. इंग्रजीचे चांगले शिक्षक नाहीत. पालकांना ते घरी मुलांचा इंग्रजीत अभ्यास घेऊ शकतील याबाबत आत्मविश्वास नाही. पण कुठं न कुठं सुरवात केलीच पाहिजे. जसं कॉम्प्युटर चालवायचा असेल तर विंडोज २००० ही एक प्रकारची भाषा आलीच पाहिजे. त्याच प्रमाणे जगात वावरायचं असेल तर उत्तम इंग्रजी आलंच पाहिजे.आणि त्यासाठी ते शक्य तितक्या लहान वयात शिकलं पाहिजे. मुलं भाषा फारच लवकर शिकतात. पण जस जसे आपण मोठे होतो तसं तसं नवीन भाषा शिकणं आपल्याला अधिक अधिक जड जात. हे सांगायला मानसशास्त्रज्ञांचा दाखला द्यायची गरज नाही. त्यामुळंच सगळे विषय जरी इंग्रजीत शिकलो नाही तरी इंग्रजी विषयाची A,B,C,D आपल्या अ,आ,इ,ई बरोबरच शिकवली गेली पाहिजे. मुंबईत नोकरी निमित्त विशीत आलेला साऊथ इंडियन तीस एक वर्ष राहिला तरी चांगल मराठी बोलू शकत नाहीत. या उलट त्यांची पाच-सहा वर्षांची मुलं चांगलं मराठी बोलतात. यावरूनच लहान वयात इंग्रजी शिकण्याचं महत्त्व लक्षात येईल.

जर्मन शिक्षणाचं वैशिष्ट्य म्हणजे 'Experimental Learning' अर्थात प्रत्यक्ष नोकरी करत असताना, अनुभवातून मिळणारं ज्ञान. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ज्यांना डॉक्टर, वकील होऊन उच्च शिक्षण घ्यायचं असेल ते बारावी पूर्ण करतात. आणि युनिव्हर्सिटीत उच्च शिक्षणासाठी जातात. तुलनात्मक दृष्ट्या अशा मुलांची संख्या कमी असते. दहावीनंतर बहुतेक मुलं व्यवसायाभिमुख शिक्षण घेणं पसंत करतात. त्यासाठी त्यांना तीन वर्ष प्रत्यक्ष कामाचा अनुभव घ्यावा लागतो. ही योजना 'अपरेंटीस शीप' या नावे प्रसिद्ध आहे.

दहावी पास झाल्या झाल्या कोणत्या क्षेत्रात जायचं असेल ते ठरवलं जातं. ज्यांना हॉटेलिंग व्यवसायात जायचं असेल ते हॉटेलात, पर्यटन क्षेत्रात जाऊ इच्छिणारे, पर्यटन कंपनीत तर इंजिनिअरींग उद्योगात येऊ इच्छिणारे कारखान्यात कामाला लागतात. प्रत्येक कंपनीला अॅपरेंटीस मुलं घेणं सक्तीचं असतं. मुलं आपापल्या आवडीनुसार

क्षेत्र आणि कंपनी ठरवतात. तीन वर्षांसाठी या कंपन्या मुलांना विद्यावेतन देतात. आठवड्यात चार दिवस कंपनी काम करावं लागतं तर एक दिवस शिक्षण संस्थेत वर्गातल्या तासांना हजर राहून पुस्तकी ज्ञान मिळवलं जातं. प्रत्येक कंपनीत मुलाचा कल बघून त्याला ठराविक खात्यामधे प्रशिक्षण देतात. कुणी वर्कशॉपमध्ये सुपरवायझर होतो तर कुणी कंपनीच्या खरेदी विभागात काम करतो अथवा विक्री विभागात विक्रेत्याचे प्रशिक्षण घेतो. या मुलांकडून कंपनीचं काम करुन घेत असताना त्यांच्या वैयक्तिक विकासाकडे कंपनी काटेकोरपणे लक्ष देते. शिवाय शिक्षणसंस्था मुलांना सर्व प्रकारे मार्गदर्शन करतच असते. या शिक्षण पद्धतीमुळं जर्मनीत बेकारीचं प्रमाण मर्यादित आहे. तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर बहुसंख्य कंपन्या त्या मुलांना लगेच नोकरी देतात. अन्यथा ही मुलं त्याच क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय सुरु करतात. या शिक्षण पद्धतीतून कामगार, सुपरवायझर इत्यादी ज्युनियर एम्प्लॉईज् तयार केले जातात; तर वरिष्ठ पदांसाठी विद्यापीठ उच्च शिक्षण देऊन मुलांना तयार करत असतं. बी.ए., बी.कॉम., अशा पदव्यांची भेंडोळी घेऊन नोकरीसाठी वणवण फिरताना आलेलं नैराश्य दूर करण्यासाठी भारतामधे आपण तरुणांना याच प्रकारचं शिक्षण देण्याची गरज आहे. अन्यथा एका बाजूला बेकारी तर दुसऱ्या बाजूला तज्ज्ञ कारागिरांचा तुटवडा अशीच परिस्थिती आपल्याकडे चालू राहील आणि त्यातून वैफल्य आलेली तरुण पिढी मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीकडे वळेल. यातूनही जर बेकारीची कुऱ्हाड कोसळलीच तर त्या व्यक्तीला पगाराच्या साठ टक्के रक्कम जर्मन सरकार बेकारभत्ता म्हणून देते. पण यासाठी दोन तीन कंपन्यांचं इंटरव्ह्यू कॉल लेटर दाखवावं लागतं.

**गाडी आवश्यक** : भारतात आपण आपल्या कुवतीप्रमाणे हवं ते रहाणीमान अवलंबू शकतो. पण युरोपात ठराविक रहाणीमानापेक्षा खालच्या दर्जाचं रहाणीमान निवडताच येत नाही. त्यामुळं व्यवसायात, नोकरीत खटपट करावीच लागते. गाडी घ्यावीच लागते. फरक इतकाच की कमी किंमतीत जुनी अथवा छोटी गाडी विकत घेऊ शकता आणि जास्त कमाई केल्यास मर्सीडीज, पोर्श, बी.एम्.डब्ल्यू, अथवा स्ट्रेच्ड लिमोझीन फिरवू शकता.

थंडी इतकी असते की गरम कपडे, नीटनेटकी आणि हीटर असलेली घरं घ्यावीच लागतात. आपल्या प्रमाणं फूटपाथवर झोपून वडा पाव खाऊन रेल्वे रुळाशेजारी प्रातर्विधी करता येत नाही. टॅक्सेस चुकवता येत नाहीत. फक्त रोखीमध्ये व्यवहार करता येत नाही. फिरायला जायचं असेल तर केवळ उच्च दर्जाच्याच ट्रेन असतात. आपल्याप्रमाणे फर्स्ट क्लास, ए.सी. अथवा रिझर्वेशन नसलेला खुराडेवजा जनरल क्लास नसतो. पंचवीसएक लोकं झोपू शकतील अशी हॉलवजा हॉटेलस् नसतात. कितीही स्वस्त असलं तरी ब्रेकफास्ट साठी युरोपात तीस-एक डॉलर मोजावेच लागतात. कामात चालढकल केल्यास सरळ उचलबांगडी होते. आपल्याप्रमाणं अकार्यक्षम, चुकार कामगारांना देखील पाठीशी घालणाऱ्या युनियन नाहीत. कंपनीच्या यशापयावरच बोनस आदी अवलंबून असतात. गिऱ्हाइकांना असंख्य पर्याय असल्यामुळं त्यांना आपल्याकडं आकर्षित करण्यासाठी प्रत्येकजण झिजत असतो.

इथलं वैशिष्ट्य म्हणजे कमीत कमी लोकात जास्तीत जास्त काम करणं. ऑफिसमधला प्यून ही जमातच इथे अस्तित्वात नाही. साहेबाची सेक्रेटरी लेटर टाईप करील, झेरॉक्स करील, पाहुण्यांच स्वागत करील, स्वतःत्यांना चहा, कॉफी बनवून देईल आणि नंतर कपबशाही विसळून ठेवील. कित्येक कंपन्यांत स्वतः डायरेक्टर, जनरल मॅनेजर या हुद्यावरच्या लोकांनी आम्हाला स्वतः चहा बनवून दिला. मॅनेजिंग डायरेक्टर, चेअरमन पदावरील लोक स्वतःची लेक्सस, मर्सीडीज घेऊन आम्हाला रेल्वे स्टेशनवर 'पिकअप' करायला आले. ''पक फळापरी मी पण ज्याचे गळले हो जीवन त्याला कळेल हो''. या ओळींचे महत्त्व त्यांना कळलं आहे. अमेरिके प्रमाणे युरोपात देखील ड्रायव्हर ठेवण्याची पद्धत नाही. ऑफिसप्रमाणेच घरी देखील

स्वावलंबनाचा अवलंब करावा लागतो. स्वावलंबनाला पाश्चात्यांनी दिलेलं नाव म्हणजे डी आय वाय (डू इट युवरसेल्फ). भारतात जसंजसं आपलं रहाणीमान वाढतं तसतसे आपण अधिकाधिक परावलंबी होतो. या उलट उच्च रहाणीमान असून देखील पाश्चात्य जगतात स्वावलंबनाला पर्याय नसतो. कधी कधी तर स्वतःच्या घराला रंग देणं, गाडी दुरुस्त करणं, गाडी धुणं, फर्निचर कंपनीनं दिलेल्या स्क्रू आणि लाकडांपासून स्वतःच्या हातानं फुर्नचरची जुळवाजुळव करणं, अशी कामे करावी लागतात.

**परंपराप्रिय युरोप** : कॉम्प्युटर आणि इंटरनेट अमेरिकनं जितक्या वेगानं आत्मसात केलं, तेवढ्या वेगानं युरोपात त्याचा विकास झाला नाही. अमेरिकेत जवळपास सर्व गोष्टी आता ईमेलवर चालतात. या उलट अजूनही बुहतांश युरोपियन कंपन्या फॅक्सवर अवलंबून आहेत. परंपरावाद हे त्यांचं वैशिष्ट्यच त्याला कारणीभूत असावं.

हॅमबर्गहून पश्चिमेकडे क्रफर्डला जाताना वाटेत Hohenbudberg Bayarwrke हे रेल्वे स्टेशन लागलं. त्या खेडं वजा छोट्याशा गावात बायर कंपनीचा प्रचंड मोठा कारखाना आहे. जणू काही खास बायरसाठीच हे रेल्वे स्टेशन आहे. तीच गोष्ट होल्समिंडन या थंड हवेच्या ठिकाणची. तिथंही ड्रॅगोको आणि हर्मन मेअर या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कंपन्या आहेत. आपल्या जमशेदपूर, वालचंदनगर प्रमाणं त्या गावातली होटेलस् आणि इतर सर्व उद्योगधंदे याच कंपन्यावर अवलंबून आहेत. बायर आणि ड्रॅगोको यांचा भारतात देखील मोठा व्यवसाय आहे. आपल्याकडं हिंदू आर्य वंशीय आहेत आणि जर्मनांचे भाऊबंद आहेत असा मोठ्या प्रमाणावर प्रचार आहे. पण जर्मनलोक याला अनभिज्ञ आहेत. मी जेव्हा त्यांना ही गोष्ट सांगायचो तेव्हा त्यांना याचं फार आश्चर्य वाटायचं.

हिंदुधर्मात कोणत्याही शुभ कार्यात स्वस्तिक चिन्हाची पूजा होते हे त्यांना विशेष वाटे. तिथल्या तरुण पिढीच्या दृष्टिकोनातून स्वस्तिक चिन्हाला कोणतेही धार्मिक महत्व नाही. या उलट कट्टर नाझी लोकांचे हे चिन्ह आहे अशी बदनामीच स्वस्तिकाच्या नशिबी आहे. नाही म्हणायला नेदरलॅंडहून जर्मनीला जाताना एका जर्मन सोल्जरनं भाईचारा पाळला. जर्मनीत पोहचल्यावर एकेठिकाणी आम्हाला ट्रेन बदलायची होती. मध्ये फक्त पाच सातच मिनिटांचा कालावधी होता. आमच्याकडचं सामान प्रचंड होतं. स्टेशनवर उतरल्यावर माझ्या सहकाऱ्यानं उसासाच भरला. एवढं मोठं सामान घेऊन, प्लॅटफॉर्म बदलून पाच एक मिनिटांत ट्रेन बदलता येणं शक्यच नाही हे तो मला पटवत होता. इतक्यात मला जवळच तरणाबांड तगडा जर्मन सैनिक दिसला. मी त्याला विनंती करताकरताच त्याच्या हातात भली मोठी बॅग टेकवली आणि काय होतय हे त्याला समजायच्या आत दुसरं सामान घेऊन चालायला लागलो.

माझ्या पाठोपाठ माझा सहकारी आणि त्याच्यामागं तो जर्मन सोल्जर सामान उचलून आपोआप चालू लागले. प्लॅटफॉर्मवर पोहोचेपर्यंत मी आणि सोल्जर बरेच पुढे आलो होतो. माझा सहकारी मागे रखडला होता. इतक्यात ट्रेन आली. ती अवघी दोन-एक मिनीटच थांबणार असल्यामुळं मी माझ्या सहकाऱ्याला मागच्या डब्यात घुसण्याची खूण केली आणि माझ्या समोरच्या डब्यात सामान चढवलं. इतक्यात ट्रेन हालायला लागली. सोल्जरनं ती भली मोठी बॅग अक्षरशः उचलून खांद्यावर घेतली आणि तो ही माझ्या मागोमाग ट्रेनमधे घुसला. ट्रेन नं वेग पकडल्यावर मी त्याच्याशी बोलायला लागलो. नुकतेच सहा महिन्याआधी शाळेतलं शिक्षण संपवून त्यानं मिलीटरी ट्रेनिंग चालू केल होतं. मी बोलत होतो ते त्याला समजतं होत, पण त्याचं इंग्रजी फारच तुटकं मुटकं होतं. सुदैवाने त्यालाही त्याच ट्रेननं यायचं होतं. मी त्याला माझ्या दंडेलशाहीचा खुलासा केला. ती ट्रेन चुकवणं आम्हाल कसं अशक्य होतं हे मी त्याला समजावून सांगितल. पण त्याचा लष्करी चेहरा निर्विकारच होता. कदाचित मी सांगितलेल्यातलं बरचसं भाषे अभावी त्याच्या डोक्यावरुन गेलं असावं.

**रेल्वेच्या सोयी** : सामानावरुन आठवलं Daushe

Bundesbahn (DB) ही जर्मन ट्रेन कंपनी इतर युरोपियन ट्रेन कंपन्यांच्या तुलनेत अधिक चांगल्या सेवा उपलब्ध करुन देते. तुमचं सामान बरच असेल आणि तुम्ही एका गावाहून दुसऱ्या गावाला जाताना मधल्या स्टेशनवर उतरुन तिथलं काम करुन पुढं जाणार असाल तर तुमचं सामान तुम्ही शेवटी जिथं पोहचणार आहात अशा गावातल्या हॉटेलच्या पत्त्यावर बुक करुन डी.बी. ट्रेनच्या हवाली करु शकता. ते आपोआप योग्य ठिकाणी जातं.

जर्मनीतल्या जर्मनीत प्रवास करायला लोक विमानापेक्षा इंटरसिटी एक्सप्रेसला प्राधान्य देतात. बहुतांशवेळा ट्रेन मधे रिझर्वेशन करण्याची गरज नसते. कारण सर्व डबे आतून एकमेकाना जोडलेले असतात आणि कुठं ना कुठं तुम्हाला बसायला जागा मिळू शकते. संपूर्ण जर्मनीभर रेल्वे ट्रॅकचं सिमलेस वेल्डिंग पूर्ण झालयं. दोन रुळाच्या मधे फट रहात नसल्यामुळं गाडी पळताना खट खट असा येणारा रुळाचा आवाज आणि सौम्य धक्का जाणवत नाही. त्यामुळंच ICE जर्मन ने प्रवास हा एक अविस्मरणीय अनुभव आहे.

हॅमबर्गहून म्युनिकला जाताना रात्रीच्या ICE ने गेलो. त्याला स्लीपिंग वॅगन असतात. प्रत्येकी एकोणचाळीस डॉईश मार्कस् भरुन युरेल पास दाखवल्यावर आपल्याला कुशेट्स (अर्थात बर्थ) रिझर्वेशन स्लीपिंग मिळतं. कुशेटस् म्हणजे सेकंडक्लास स्लीपर बर्थ. फर्स्ट क्लास ची स्लीपिंग वॅगन अगदी लक्झरी असते. प्रत्येकासाठी स्वतंत्र केबीन. आंघोळीसाठी स्वतंत्र बाथरुम, डीनर ब्रेकफास्टची व्यवस्था असा साहेबी थाट असतो. त्यासाठी फर्स्टक्लासचा युरोपास असेल तर वरती प्रत्येकी एकशे नव्वद डॉइश मार्कस् द्यावे लागतात. अर्थात हे दर हॅमबर्ग ते म्युनिक या अंतरासाठीच आहेत. इतर ठिकाणांसाठी या दरात थोडाफार फरक असतो. उदाहरणार्थ स्ट्रासबोर्ग ते कान (दक्षिण फ्रान्स मधलं प्रेक्षणीय स्थळ) कुशेटसच्या प्रवासाठी युरेलपास व्यतिरिक्त प्रत्येकी चोप्पन डॉइश मार्कस् तर फ्रॅंकफर्ट परिससाठी प्रत्येकी अठ्ठ्याऐंशी फ्रेंच फ्रॅंकस् द्यावे लागतात.

म्युनिकहून स्ट्रासबोर्ग (फ्रान्स) कडे जाताना येणारी ट्रेन ऑस्ट्रियन कंपनीची होती. तिला पहिल्या तीन वॅगन कार ठेवण्याच्या होत्या. आपल्याकडे ज्या प्रमाणं नवीन कार ट्रेलरमधे ठेऊन नेतात तसाच प्रकार असावा, अशी माझी धारणा झाली. पण नीट बघितल्यावर दिसलं त्या कारस् जुन्या होत्या. चौकशीअंती कळलं की तुम्ही लांबचा प्रवास कारणार असाल तर त्याचिक ट्रेनमधून तुम्ही स्वतःची कार नेऊ शकता. म्हणजे रात्रभर कार चालवायचा त्रास नाही आणि नवीन गावी कार अभावी गैरसोय नाही किंवा टॅक्सीवाल्यांशी हुज्जत नाही. भारतीय रेल्वे मात्र अशी सेवा देईल तो सुदिन ! मलाही माझी सॅंट्रो ट्रेनमधे ठेऊन केरळला न्यायची फार इच्छा आहे.

अमेरिकेत आणि इतरत्र मी लाकडाची घरं बघितली होती. प्रचंड थंडीवर मात करायला लाकडाचीच घरं लागतात म्हणे. लंडनमधलं आमच चार मजली हॉटेल देखील लाकडाचंच होतं. चालताना पायाखालचं लाकूड कुरकुरत असे. जर्मनीत मात्र त्यांच्या परंपरेला साजेशी सिमेंट कॉंक्रीटची घरं पहायला मिळाली. अगदी आपल्यासारखी. फक्त छत उतरत्या कौलांच असतं आणि सर्व बंगले लांबून सारख्याच आकाराचे आणि रंगाचे दिसतात.

**माऊथ फ्रेशनर** : म्युनिक ते न्यूरेनबर्ग प्रवासात श्रीमती हॅनेलोर कोवलर ह्या सत्तर वर्षाच्या वृद्धा भेटल्या. त्या ग्रॅज्युएट होत्या. त्यांना चांगल इंग्रजी येत होतं. त्यांनी मला बरीच माहिती दिली. मी माझ्या जवळची 'वेलची' त्यांना 'इंडियन माऊथ फ्रेशनर' म्हणून दिली. त्यांना ती खूप आवडली. त्यामुळं माझ्या जवळचा दहा बारा वेलचींचा स्टॉक मी त्यांना दिला. त्यावरही त्यांच समाधान झालेलं दिसलं नाही. तेव्हा भारतातून पाव किलो वेलची पार्सलन पाठवायचं कबूल केलं. त्यांनी सुप्रियासाठी छोटसं ख्रिसमस ट्री दिलं. त्यांचा डॉक्टर नवरा चार पाच वर्षापूर्वी हार्टअटॅकनं गेला होता. मुलगा फ्रॅंकफर्टच्या बॅंकेत वरच्या हुद्दावर आहे. पण ही म्हातारी फ्रॅंकफर्टवरुन ट्रेनच्या तासभर अंतरावर एका

खेड्यात. तिच्या तेरा खोल्या, स्विमींग पुल असलेल्या बंगल्यात एकटी रहाते. तिला महिना चार हजार डॉइश मार्कस् इतकी सरकारी पेन्शन आहे.

भारतात म्हातारी माणसं आपल्या मुलांबरोबर रहातात आणि नातवंडांना सांभाळतात हे ऐकून ती गहिवरली. तिच्या डोळ्यांत फ्रँकफर्टमध्ये रहाणाऱ्या तिच्या नातवंडांची आठवण तरळली. तिच्या गावात आरती, सुप्रियाला घेऊन रहायला यायचं प्रेमळ निमंत्रण तिनं दिलं. जर्मन लोक कठोर, भावनाशून्य असतात हा माझा समज तिथंच गळून गेला. तीनेक तासाच्या ICE मधल्या सहवासानंतर न्यूरेनबर्ग स्टेशनवर उतरण्याआधी मी तिला जेव्हा वाकून भारतीय पद्धतीचा नमस्कार केला तेव्हा ती सुन्न झाली. वृद्धांना भारतात इतका मान आणि प्रेम दिलं जातं का ? असं ती परत परत विचारत होती. यातच आपली भारतीय संस्कृती उजळून निघाली होती.

श्रीमती कोबलर, श्री. अॅपलहन्स यासारख्या काही जर्मन लोकांना बोलत असताना मधे "ना?" असा प्रश्न विचारण्याची खोडं बघून मला खूप आश्चर्य वाटलं. कारण अशीच प्रश्न विचारण्याची लकब कित्येक मराठी लोकांमधे जाणवते. नेमका तोच शब्द त्याच अर्थी त्याच लकबीत जर्मन आणि मराठी लोक कसा वापरतात ?

**माकड टोपी**

मला जर्मनीतली रात्रीची थंडी सोसवत नसे. त्यामुळं बहुतांश वेळा मी माकडटोपी देखील घालत असे. कितीही थंडी असली तरी जर्मन लोकांचं डोकं बोडकचं असे. प्रवासात भेटलेल्या एका डॉक्टरनं सांगितल्या प्रमाणं थंड प्रदेशातील लोकांची कवटी तसंच डोक्याची रचना कडाक्याच्या थंडीला 'तोंड' देता येईल अशी असते. तिथल्या लोकांना माझी मंकी कॅप बघून मजा वाटत असे. आपल्याकडं ज्याप्रमाणं उन्हात छत्री उघडून चाललेल्या मुलीकडं थट्टा मीश्रित डोळ्यांन बघितलं जातं तशाच नजरा मला तिथं जाणवत असत. पण मला प्रदीर्घ दौरा करायचा असल्यामुळं काळजी घेणं भाग होतं.

म्युनिकला रात्री जेवण करुन आम्ही हॉटेलवर परतत असताना अचानक पोलीसांची एक गाडी आमच्या जवळ थांबली आणि ते आम्हाला गाडीत बसण्याविषयी सूचना करु लागले. माझे सहकारी पुरते हादरले. माझ्या लक्षात आल. माकड टोपीन घात केला होता. मी त्यांना शांतपणे माझा पासपोर्ट, व्हिसा दाखवला. आणि माकड टोपी घालण्याच प्रयोजन खुलासेवार सांगितल. त्यांना माझा खुलासा पटला त्यावर अशी टोपी घालणं हा गुन्हा नाही पण गुन्हेगार गुन्ह्याच्या वेळी यासारखी टोपी घालतात म्हणून त्यांचा संशय बळावला होता. माकडटोपीन केलेली माकडचेष्टा चांगलीच अंगी आली असती पण सुदैवाने माझ्या खिशात माझा पासपोर्ट असल्यामुळं जर्मन पोलीस हिसका बघण्याची संधी हुकली.

युरोप अखंड असावा आणि युरो हे एकमेव चलन असावं यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या कडे युरोपियन युनियनचं नेतृत्त्व येण्याला फक्त फ्रान्सचा अडथळा आहे. ब्रिटिश तर त्यांच्यात बिलकुल सामील होऊ इच्छित नाहीत. महासत्ता होण्याचं स्वप्न दोन महायुद्धांनी धुळीस मिळवल्यानंतर जर्मनी युरोपियन युनियनच्या निमित्तानं तिसऱ्यांदा प्रयत्नाला लागला आहे. याही वेळेला ब्रिटिश आणि फ्रेंच त्यांच्या मार्गावर काटे अंथरत आहेत. ही लढाई आर्थिक पातळीवर खेळली जाणार आहे. त्यात जर जर्मनी यशस्वी झाली तर जगात अमेरिका, चीन आणि जर्मनीच्या नेतृत्त्वाखालच्या अखंड युरोप अशा तीन महासत्ता असतील. शंभरएक वर्षांची मेहनत, दोन महायुद्धांचे आघात, एकदा बसलेला फाळणीचा धक्का, तीन चार पिढ्यांनी सोसलेलं दुःख आणि मानहानी या सर्व सागर मंथनातून अमृत काढण्यात जर्मनी यशस्वी होईल का ?

**अजित पाटील**
९०४, मैत्री आनंद, लुर्दस वाडी, ठाणे.
दूरध्वनी : ५८२८७०१ भ्रमणध्वनी : ९८२११९२२८८

• • •

# " वंदे - मातरम् "

*वंदे मातरम् ह्या नाटकाचे रसग्रहण व परीक्षण. - संपादक*

"वंदे-मातरम्" ह्या दोन शब्दांकरता साठ वर्षांपूर्वी ब्रिटीशांनी असंख्य भारतीयांना, लाथा बुक्क्यांनी मारले, कित्येकांची डोकी फोडली, बंदुकीच्या गोळ्या झाडल्या, तो आपल्या भारताचा जिवंत इतिहास साकारला आहे या वन्दे मातरम् नाटकात !! 'हे नाटक नव्हे-सत्य घटना आहे.' हे जाहिरातींचे शीर्षक अगदी समर्पक आहे, हे नाटक बघताना पदोपदी जाणवते. विदेशी कपड्यांची होळी. 'भारतमाता की जय' 'वंदे-मातरम्' 'जय-हिंद' अशा उत्स्फूर्त घोषणांनी, खादीची वस्त्रे परिधान केलेली एक सात आठ जणांचे एक टोळके (टोळके म्हणने जास्त संयुक्तिक वाटते, कारण स्वातंत्र्य युद्धाने प्रेरित झालेले, सर्वस्वाची आहुती देणारे हे स्वातंत्र्यवीरांचे टोळके एक नव्हे अशी अनेक टोळकी त्या काळात अगदी जय्यत तयारीत असायची). 'युनियन जॅक' त्या होळीत जाळत असताना, सोल्जर बंदुकीच्या फैरी झाडतात, त्यात आपला तिरंगा फडकवत, खाली पडू न देता प्राणपणाने रक्षण करत. 'जयहिंद' चा नारा लावून तेथेच नेटाने उभे रहातात. अशी अंगावर रोमांच उभे करणारी वातावरणनिर्मिती करुन रसिक प्रेक्षकांना थेट स्वातंत्र्यपूर्व काळात नेऊन, नवीन युवा पिढीला, जुन्या स्वातंत्र्यसमराची प्रत्ययकारी लढत कशी तीव्र होती हे अत्यंत भावस्पर्शी चित्र उभे करण्यात या नाटकाचे लेखक दिग्दर्शक व कवी श्री. अभिजीत पानसे यांनी खरोखरच बाजी मारली असून, अतिशय सुरेख दर्शन घडवले आहे. दिग्दर्शनाच्या बाजू संभाळताना व हे पहिलेच नाट्य सादर करताना एक जबरदस्त झेप घेतली असून ती समर्थपणे पेलली आहे.

चाळीस कलाकारांना एकत्र घेऊन त्यांच्याकडून वेगवेगळ्या प्रकारचे अभिनय करवून घेऊन आपली नाट्यकृती, आपले विचार, आपल्या काव्यातून अभिप्रेत असणारी कल्पना, वास्तवात उतरवून, थेट प्रेक्षकांच्या अंतःकरणाला भिडवण्याचे सामर्थ्य दाखवून श्री. पानसे यांनी आपल्या पहिल्याच नाटकात अत्यंत यशस्वीपणे प्रयत्न केला आहे. यात शंका नाही. कुसुमाग्रज यांच्या 'गरजा जयजयकार क्रांतीचा' नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे 'तुम मुझे खुन दो... मै तुम्हे आजादी दूंगा ।' चाफेकर बंधूंचे 'गोंद्या आला रे आला' लोकमान्यांचे 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच स्वराज्याचा सूर्य झाकण्याची शामत आता कुणाच्यातही नाही' अशा तऱ्हेची देशभक्तीची आदर्श वाक्ये मधून मधून कलाकारांच्या तोंडी टाकून, म. गांधींची हत्या 'हे राम' 'सबको सन्मति दे भगवान ईश्वर अल्ला तेरो नाम' अशी चपलख वाक्ये योग्य जागी 'कोंदणात' बसवून नाटकाची सुरुवात अतिशय सुरेख केली आहे.

या नंतर जुन्या /नव्या पिढीचा संघर्ष, वाद, मॅट्रीक झाला की कुठेतरी सरकारी नोकरीत चिकटवून टाकले मुलाला की आपल्या जन्माचे सार्थक झाले असे समजणारी साठ वर्षांपूर्वीची पिढी, आणि 'मी इंजिनिअर होणार, फिल्मी हिरो/हिरोइन होणार, प्रेम करणार' अशा मनोवृत्तीची आजची तरुण पिढी, त्यांचे काव्यातून व्यक्त केलेले विचार

'आपण साला प्रेम करणार
त्या चंद्राला उचलून नेणार
तो सूर्य मुठीत घेणार-
वाटलं तर अथांग सागर
क्षणात एक थेंब करणार

आपण साला प्रेम करणार-

बेदरकार, बेफाम, बेधडक,
अशा 'बे' च्या पाळ्यामधे आम्ही जीव ओततो
या धुंद वाऱ्यामधे आम्ही नशा शोधतो
जाऊ दे असले शब्द तरी तुम्हाला काय कळणार
बेकारीचा शिक्का मारुन तुम्ही आम्हाला टाळणार.

काहीतरी सांगा तुम्हाला क्षितीजा पुढचं दिसतं ?
आमचं म्हणणं हेच, कुणी आमच्या सारखं नसतं ॥

अशी नवकाव्याची, उपहासात्मक काव्यरचना संपूर्ण नाटकात, ठिकठिकाणी, समर्पक जागी, प्रेक्षकांच्या कानावर आदळते व त्यातील उपहास, सहजता, गर्भितार्थ मथितार्थ, शाब्दिक बोचणी प्रेक्षकापर्यंत अगदी अलगदपणे पोचते.

देशप्रेमाने भारावून एक तरुण सैन्यात भरती होतो. त्या अगोदर तो प्रेमात पडून एका तरुणीशी विवाहित होतो. युद्धात धारातीर्थी पडून, त्याला झुंझार शौर्य गाजवल्याने 'परमवीर चक्र' मरणोत्तर मिळवतो. पण त्याच्या कुटुंबाचे हाल कुणीच खात नाही. साधे पेन्शनचे काम सुद्धा होत नाही. त्या वीरपत्नीचे दुःख एका सुंदर काव्यात गुंफून ते प्रेक्षकांपर्यंत समर्थपणे पोचवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाले आहे.

कोण म्हणे मेलास तू ?
कोण म्हणे गेला तू ?
कोण म्हणे झुंजता झुंजता
कोण म्हणे संपलास तू.

मृत्यूचाही थरकाप झाला
जिंकून जग गेलास तू
निमिषात एक आयुष्य आमुचे
लाख लाख जगलास तू.

ताई अशा कामांना थोडा वेळ लागतो
कशाला चकरा मारताय?
तुम्ही तरास घेऊ नका ताई
तुमच्या कामात अगदी नीट लक्ष द्यायला सांगतो
बघा साहेबांना... तेवढ थोड आमच्याकडवी
लक्ष असू द्यात

सरकारी काम आहे ते मंत्र्यांना सांगून पाहतो.
पुढच्या आठवड्यात या मुलांच्या परीक्षा आल्यात

भ्रष्टाचार, वशिलेबाजी, लालफितीचा कारभार, सरकारी खाक्या, कुणाचाही कुणाला ताळमेळ नाही, कुणीही कुणाकरता काही करत नाही, करणार नाही. प्रत्येक जण स्वार्थाने बरबटलेले, 'दाम करी काम' या वास्तवतेचे यथार्थ दर्शन, स्वातंत्र्य मिळून ५४ वर्षे झाली तरी आपण भ्रष्ट कोळीष्टकात अडकून तिथल्या तिथेच ह्या टेबलावरुन त्या टेबलावर भिंगरीसारखे फिरत राहतो. काम काही होत नाही. मग पूर्वीचे संस्कार गेले कुठे? तुमच्या-आमच्या पूर्वजांनी केलेला अभूतपूर्व त्याग देशप्रेम, निःस्वार्थीपणा, कर्तृत्व हे सर्व गुण इतिहासजमा झाले की काय ? असा गंभीर प्रश्न निर्माण केला आहे.

शाळेत जाणाऱ्या मुलीला वीरपत्नी शिकवते

म्हण 'अ' अभिमानातला
असामान्यातला
'ब' बंधुभावातला
बंधुभावातला 'ब'

पण लहान मुलगी आईला सांगते-

'अ' अननसातला
'ब' बदकातला 'ब'
आणि कमळातला 'क'

मग आई (वीरपत्नी) आपल्या मुलीला समजावते. आपण अननापासून अभिमानापर्यंत जायच आणि असामान्य व्हायचं!

अशा तऱ्हेची नवीन बाराखडी निर्माण करुन नाटकाचे दिग्दर्शक श्री. अभिजित पानसे यांनी आपल्या विचारांची एक नाविन्यपूर्ण बैठक मांडून एक काव्यात्मक आविष्कार सादर केला आहे. आणि प्रेक्षकांच्या गळी आजची वस्तुस्थिती, वास्तवता उतरवण्याचा प्रयत्न एक यशस्वी तितकाच प्रभावी प्रयत्न केला आहे.

त्यानंतर जातीपाती, वर्णद्वेष यावरही सुंदरसा प्रकाशझोत टाकला आहे.

'लक्षात ठेवा आपला देश
अनेक धर्म अनेक वेष
भेदभाव मानू नका
कमी कुणा लेखू नका
प्रत्येक इथला समान आहे
प्रत्येकालाच देशाभिमान आहे
जातपात मानू नका
कमी कुणा लेखू नका
जातपात मानू नका, भेदभाव करु नका'

सध्याच्या वास्तवतेचे यथार्थ सादरीकरण करुन यातून खूपच विचारमंथन सुरु करुन दिले आहे. नवीन पिढीचे विचार अतिशय सुबकपणाने मांडले आहेत.

इथे दिवसागणिक स्पर्धा वाढतीय
क्षणात सारं संपतय
आई तुम्हाला न फक्त
बोलायला जमतयं
मलाही माझ आयुष्य उभ करायचय
हे बघ माझ्या अॅडमिशनकरता मी याच रस्त्याला वळणार
जाऊ दे तुम्हाला नाही कळणार-

'ए' फॉर ऑल
'बी' फॉर बिअर
'सी' फॉर सिगरेटस्
'डी' फॉर डान्स्

वन टू थ्री फोर अमेरिका । अमेरिका ।अमेरिका मेरी जान

उठसूट अमेरिकेला जाणाऱ्या पुढच्या पिढीला आणि त्यामुळे खूष असणाऱ्या आईवडिलांना एकाकी जीवन जगावे लागते आणि वेळेवर कुणीच मदतीला न आल्याने हॉस्पिटलात पोचायला उशीर होऊन वडिलांचा मृत्यू वाटेवरच होतो. डॉक्टर विचारतात तुमच्या घरच्यांना कळवा, तेव्हा अगतिक आई म्हणते नाही घरी कुणीच नाही. आमची मुले/सुना अमेरिकेत असतात. अमेरिका मेरी जान!! हा छोटासा किस्सा बरंच काही सांगून जातो.

यानंतर क्रिकेटचे फाजील प्रेम, भारतावरील पाकिस्तानचे आक्रमण यावरील सुद्धा अर्थपूर्ण, रसभरीत काव्य, अत्यंत भेदक, चित्ताकर्षक आहे. निराशेच्या गर्तेत सापडलेल्या तरुणांना दिलेला संदेश बराच काळ स्मरणात रहावा असा आहे.

'माझ्या फरफटीचं नाही करणार मी भांडवल
त्याबद्दल नाही बोलणार भडाभडा
घ्यायचाच झाला तर माझ्याकडून घ्यावा लागेल
एक वेगळाच धडा-
धडा, हो घेतला ना!
खरचं धडा घेतला, आता वाटत उगाचच
हा इतिहास घोकून पाठ केला.

ठीक आहे, पण वर्तमान घडवणं तुमच्याच आहे हातात,
फक्त मन शुद्ध हवं आणि ताकद हवी मनगटात ॥

एकच करायचं आशेची ज्योत विझू द्यायची नाही ॥
कुठल्याही स्थितीत हिंमत नाही हरायची ॥

आणि मग आपल्या आयुष्याची समृद्ध इमारत आपणच उभी करायची आणि शेकडो वंदे मातरम् चे श्रवणीय स्वर कानावर पडतात त्यामधेच आज पुन्हा लढायला हवं!

एक आयुष्य घडायला नवं
आज पुन्हा लढायला हवं
कुठं चुकतय कळायला हवं
पुन्हा स्वातंत्र्य मिळायला हवं
आज पुन्हा लढायला हवं

हा संदेश देऊन नाटकाचा शेवट होतो. पण त्याचा साऊंडट्रॅक एवढा परिणामकारक आहे की प्रत्येक प्रेक्षक अत्यंत भारावलेल्या मनस्थितीत आपण कुठे भरकटत चाललो आहोत याचा मागोवा घेत

'' वंदे मातरम्''

म्हणतच नाट्यगृहातून बाहेर पडतो.

''दत्तविजय प्रॉडक्शन'' हे दुसरे दमदार नाटक असून नेपथ्य, प्रकाश योजना श्री. सुनील देवळेकर यांनी अत्यंत नीटनेटकेपणाने व अतिशय उत्कृष्टपणे सांभाळली आहे. श्री. दत्ता घोसाळकर हे निर्मितीप्रमुख व संगीताची बाजू श्री. कौशल इनामदार यांनी अत्यंत कुशलतेने हाताळली आहे. साथसंगत पार्श्वसंगीत उच्च दर्जाचे आहे. चाळीस कलाकारांमध्ये धारातीर्थी पडलेला जवान व त्याची वीरपत्नी यांच्या भूमिका करणारे पूर्णिमा कर्णिक व अजित परब यांनी या भूमिकेत जीव ओतून काम केले आहे. दिग्दर्शक श्री. अभिजित पानसे यांचे काव्य, लेखन खचितच प्रभावी आहे.

नाट्य समीक्षण :-

**सुरेश देशपांडे**
१/२, जान्हवी अपार्टमेंट, चरई, ठाणे-४०० ६०१.
दूरध्वनी: ५४३०९९८

•••

श्री. मोहन पाठक यांस,

सस्नेह नमस्कार,

एप्रिल २००१ चा 'दिशा' चा अंक मिळाला आणि माझे मन अतिशय आनंदून गेले. भावे व्याख्यानमालेसाठी मी जो स्त्री आणि तिच्या शक्तीला बाधा आणणारे प्रश्न यांचा अभ्यास केला होता तो एकत्रित स्वरुपात आपण मला उपलब्ध करुन दिलात म्हणून किती आभार मानू ? एवढे परिश्रम घेऊन, टेप ऐकून त्यावरुन लेख तयार करण्याचे काम किती जिकीरीचे आहे याची मला कल्पना आहे. पण स्त्री शक्ती किती जिद्दीची याचाच जणु प्रत्यक्ष दीपाली भाटकरने आणून दिला. मी तिच्या या कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.

संपादक मंडळाचे सर्वांगसुंदर विशेषांका बद्दल मनःपूर्वक अभिनंदन. आपल्या अंकास माझ्या शुभेच्छा.

आपली स्नेहांकित

**विजया वाड**

प्रसिद्ध साहित्यीक व.पु. काळे यांचे निधन झाले.
त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# "वाटेवरती वरती काचा गं !"

एक सुंदरस टुमदार घरकुल. प्रेमळ भिंतींनी उभारलेलं. मायेच्या ओलाव्याने ओथंबलेलं. या घरकुलाच्या बागे मध्ये छोट्या छोट्या कळ्या उमललेल्या. हसायच्या, नाचायच्या, डोलायच्या, खेळायच्या, एकेमेकींच्या हातात हात गुंफून नाचायच्या. हे छोटसं घर असंच हसतं खेळतं रहावं म्हणून आई-बाबा कामासाठी घरा बाहेर पडलेले. पर्यायाने मुलींना पाळणाघरात ठेवून. धकाधकीत दिवस सरतात आणि हसणाऱ्या, बागडणाऱ्या कळ्या हळू हळू उमलू लागतात. पण रोजच्या कामाच्या गडबडीमध्ये आई-बाबांना कळतच नाही की मुलींना आता आपली जास्त गरज आहे. आणि मग या नाचणाऱ्या कळ्या, जेव्हा जमिनीवर पाय रोवून उभ्या रहाण्याचा प्रयत्न करतात तेव्हा लक्षात येतं की इथे तर वाटेवरती काचा आहेत. जीवघेण्या वेदना देणाऱ्या, खोलवर जाऊन जखम करणाऱ्या, भळाभळा रक्त काढणाऱ्या, आई-बाबांना सांगायचं कसं? ते आपपल्या कामात गर्क. सांगितल तर म्हणतात, तुम्हालाच नीट चालायला नको, आपणच नीट बघून-सावरुन चालायचं असतं. या जखमा शेवटी खोलवर जातात आणि घर करून बसतात.

ही गोष्ट आहे तुमच्या, माझ्या, साऱ्या समाजातल्या कुमार वयीन मुलांची, कालची, आजची आणि उद्याची सुद्धा. आज प्रत्येक तीन मुलींमागे एकीचं शोषण होत असतं. आणि ते सुद्धा माहितीतल्या, मैत्रीतल्या, नात्यातल्या व्यक्तींकडून. परक्या पुरूषाकडून बळजबरी झाली तर आपण त्याला बलात्कार म्हणतो पण जेव्हा घरातल्या जवळच्या व्यक्तीकडून हे लैंगिक शोषण होत असतं तेव्हा मोठी कठीण परिस्थिती येते. सांगायची लाज वाटते. कसं सांगु, काय सांगू, आई-बाबा माझं ऐकतील का? त्या व्यक्तीकडून पुढे त्रास नाही ना होणार? अनेक गुंतागुंतीच्या समस्या डोक्यात घोळत रहातात. कितीतरी वेळा आई-बाबांना सांगून सुद्धा त्यांना त्यांच्या कामाच्या व्यापात या गोष्टींचा सिरिअसली विचार करायला वेळ नसतो. त्या मुळे मुलींमधे अपराधी पणाची भावना निर्माण होते. पण मनामधे प्रचंड भीती असते. तोच तोच प्रसंग, तेच तेच क्षण सारखे डोळ्यासमोर उभे रहातात. त्या स्पर्शाच्या जाणीवेने अंगाचा थरकाप होतो ! मग कोणाशी बोलावंस वाटत नाही. सगळ्यांच्या अंगावर ओरडावसं वाटतं ! सगळ्यांना मारावसं वाटतं! स्वतः मरून जावसं वाटतं. आत्मविश्वास संपून जातो. भीतीमुळे अपंगत्व येतं. किंवा 'नको तो प्रसंग पुन्हा!'' म्हणून वैफल्य येऊन मुली आत्महत्येला प्रवृत्त होतात !

'कळसूत्री' निर्मित 'वाटेवरती काचा गं !'' ही मीना नाईक यांच्या संकल्पनेतून व दिग्दर्शनातून साकारलेली व डॉ. अनिल बांदिवडेकरांनी लिहिलेली नाटिका, अशाच एका मयुरीची गोष्ट सांगते. ही 'नाटिका' न म्हणता, एक ज्वलंत वास्तव जे आज पर्यंत पडद्यामागे लपून राहिलं होतं, ज्याची चर्चा झाल्याचं, जे समाजापुढे मांडण्यात आल्याचं ऐकण्यात आले नाही, त्या वास्तवाचं एक नाट्यमय सादरी करण म्हणता येईल. याला स्पष्टपणे 'बलात्कार' म्हणता येणार नाही. कारण बलात्कार हा काही क्षणांचा, काही काळा पुरता, आणि क्वचित् प्रसंग वगळता, तो परक्या व्यक्तीकडून असतो. पण ज्या लैंगिक शोषणाचा विषय 'वाटेवरती काचा ग!' मधे मांडलेला आहे, त्याला 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' म्हणता येईल. कारण हे अशा प्रकारचे लैंगिक शोषण हे घरातल्या नात्यातल्याच, आणि अगदी प्रेमाचं, मानाचं आणि महत्त्वाचं स्थान असलेल्या व्यक्तीं कडून बारंवार होत असतं. जिचं शोषण होत असतं तिला कायम हीच भीती असते, की आपण हे जर घरामधे

बोललो तर आपल्यावर विश्वास कोण आणि किती ठेवणार? पुढे पुढे या व्यक्तीच्या संपर्कातून सुटका नाहीच, त्या मुळे पुढे अजून काय वाढून ठेवलं असणार आहे? याला अंतच नाही.

म्हणूनच पालकांनी, शिक्षकांनी आणि तेरा वर्षांवरील वयाच्या मुलींनी आवर्जून बघण्या सारखी ही नाटिका आहे. या कथानकातील मयुरी, तिच्या धाकट्या बहिणी बरोबर हसत खेळत वाढलेली. वडील कामा निमित्त परदेशात असतात. आणि वडिलांच्या अनुपस्थितीमुळे संसारातल्या सगळ्या गोष्टी अंगावर येऊन पडलेल्या आणि शिवाय नोकरी! अशी तारेवरची कसरत करणारी आई. घरामध्ये मोठी म्हणून स्वतःची कामं स्वतः करणं आणि स्वतःकडे स्वतःच लक्ष देणं हे सहाजिकच बिचाऱ्या मयूरीवर येऊन ठेपलेलं. शाळेतून आल्यानंतर वडिलांच्या मामेभावाकडे गणिताच्या शिकवणीसाठी जाणं हे गरजेचं ठरलं. आणि मग या शिकवणीच्या सत्रातून जवळ येणं, पाठीवरून हात फिरवणं, शाबासकीच्या नावाखाली पापी घेणं वगैरे सुरु होतं. या गोष्टी सुरुवातीला आईला सांगून बघण्याचा मयूरी खूप प्रयत्न करते, परंतू आई तिला कधी रागावून तर कधी प्रेमाने, 'अग तो तुझ्या बाबांचा भाऊ आहे, बाबां सारखाच आहे तो, बाबांच्या जागी आहे, असं समजावून सांगते.' परंतु जेव्हा ह्याचा अतिरेक होतो आणि मयूरीला तो काका, ' जर तू ह्याची वाच्यता कुठे केलीस, तर थोडे दिवसांनी श्रेया पण माझ्याकडे शिकवणीला येईल, मग काय करशील?'' असं म्हणून मयुरीचं तोंड बंद करतो. तेव्हा मात्र भीती पोटी ती गप्प बसते. पण भीतीमुळे अपंगत्व आलेली मयुरी मावशीला सगळ्या गोष्टी स्पष्ट सांगून टाकते तेव्हा या विषयाला तोंड फुटतं.

अतिशय सरळ, सोपी, सुटसुटीत भाषा, नेमकंच नेपथ्य आणि सगळ्या पात्रांचा, विषेश करून मयूरी झालेल्या प्रिया बापट हिचा सहज सुंदर अभिनय या सगळ्या मुळे अत्यंत साधा, तरीही विलक्षण परिणामकारक. हात बाहुल्यांचा वापर करून प्रत्यक्ष कृती कशी केली गेली, आपल्या शरीराचा 'प्रायव्हेट झोन' म्हणजे काय, हे तक्त्याच्या आधाराने समजावून देणे, या सगळ्या मधला अश्लील व मुलींना भीती दायक वाटेल असा भाग बाहुल्यांचा वापर करून, अत्यंत प्रभावी पणे मांडण्यात आला. असा हा प्रेक्षकांना खिळवून टाकणारा नाट्यप्रयोग! डॉ. अनिल बांदिवडेकर व मीना नाईक यांनी या दृकश्राव्य माध्यमातून शिक्षण क्षेत्रासाठी केलेलं एक समाजकार्यच आहे. हा एक शैक्षणिक उपक्रम आहे आणि म्हणूनच याला शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य मिळावं. सर्व शाळांमध्ये, शैक्षणिक उपक्रम म्हणून प्रत्येक मुख्याध्यापकांनी हा प्रयोग दाखवावा.

या प्रयोगानंतर झालेल्या चर्चे मध्ये स्वतः मीना नाईक, या नाटिकेतील सर्व कलाकार, मनोविकार तज्ज्ञ व कौंसिलर शुभा थत्ते व सर्व विद्यार्थी व पालक सहभागी झाले होते. मुलींनी अगदी मोकळे पणाने आपल्या समस्या व प्रश्न त्यांच्या पुढे मांडले आणि पालकांनीही आपल्या अडचणी व समस्यांची चर्चा केली. या अशा प्रसंगांना कसे तोंड द्यायचे, कसं सामोरे जायचं, आपल्या पाल्याला कशा गोष्टी समजावून द्यायच्या. याच मार्गदर्शन सौ. मीना नाईक व शुभा थत्ते यांनी केल. मुलींच्या एकंदर चर्चे मधून असं कळून आलं की हा प्रयोग बघून त्यांचा आत्मविश्वास वाढावला असून अशा प्रसंगाना त्या धैर्याने सामोऱ्या जातील.

**सौ. विशाखा देशपांडे**
अे. के. जोशी स्कूल
ठाणे.

• • •

# डॉट-केम-डॉट गॉन

*डॉट कॉम कंपन्यांचे दिवाळे वाजण्यास सुरुवात झाली आहे. या मागे बरीच आर्थिक गुंतागुंतीची कारणे आहेत. सदर लेखात अशाच कारणांचा परिचय आला आहे. - संपादक*

तहलका डॉट कॉमच्या श्री. तरुण तेजपाल यांच्यावर हल्ला झाला. श्री. तेजपाल यांनी जो तहलका करून दाखवला त्यामुळेच त्यांच्यावर हा हल्ला झाला. राजकारणाच्या ज्या बाजू या घटनेने समोर आल्या असतील त्या वेगळ्याच. पण डॉट कॉम व्यवसायावर सुद्धा या घटनेने प्रकाश पडला.

कोण्या ऐके काळी 'सिलिकॉन व्हली'' नावाचे शहर होते. तेथे ''इंडियन सॉफ्टवेअर प्रोफेशन्सल'' या बिरुदावलीचे राजे राज्य करत असत. असे म्हणत की या अमेरिका देशाच्या दोन राजधान्या होत्या. एक वॉशिंग्टन आणि दुसरी सिलिकॉन व्हॅली. या सिलिकॉन व्हॅलीमध्ये अस्तित्व रहाण्यासाठी बऱ्याच क्वालिफिकेशन्स गरजेच्या असत. इंजिनिअरींगची डिग्री, सॉफ्टवेअरवरच्या पूर्ण कमांड, कमीत कमी हार्डवेअरचे 'सॉलीड' नॉलेज आणि जोडीला प्रोफेशनल ॲटिट्यूट ! सिलिकॉन व्हॅली ही अनेकांच्या मनातील जादुनगरी होती, जणू नंदनवनच ! अनेक डॉट कॉम कंपनीज या प्रोफेशनल्स ना आपल्याकडे खेचून घेण्यासाठी काय वाटेल ते करत असत. पण अचानक या राजांची सद्दी फिरली.

एकेकाळच्या त्या नंदनवनात आज स्मशान असल्यासारखे चित्र दिसत आहे. ॲमेझॉन डॉट कॉमने अमूक एक इतका, तर याहूने तमुक इतका तर फलान्या कंपनीने तमुक इतका स्टाफ कमी केला, अशा बातम्या येत आहेत. मोठमोठ्या कंपनीजनी फायदे कमी होण्याच्या वॉर्निंग्ज दिल्या आहेत. तर बाकी काहीनीं सरळ तोटे जाहीर केले आहेत. बऱ्याच डॉट कॉम कंपन्या ठार मेल्या, तर काही ऑक्सिजनवर आहेत. एकेकाळच्या या नंदनवानाची ही स्मशानवत अवस्था का झाली ?

इन्फोटेक कंपनीज लयाला जाण्याची कारणे अगदी सरळ आहेत. जसा रस्त्यावरच्या प्रत्येक दुकानदाराचा धंदा चालतोच असे नाही. तसा प्रत्येक डॉट कॉम व्यावसायिकाचा व्यवसाय चालेलच याची गॅरंटी देता येत नाही. काहींचे धंदे चढतात, काहींचे पडतात. इंटरनेट बद्दल लोकांच्या मनात उत्सुकता आणि उत्साह फार प्रचंड होता. इतका हलकल्लोळ झाला की जणू परमेश्वराचा अवतारच झाला की काय? इंटरनेटच्या क्षमतेबद्दल तर इतक्या गप्पा मारल्या गेल्या की जणू इंटरनेट हा मानवाच्या सर्जनशीलतेचा परमोच्च बिंदूच ! पण सुदैवाने हे वेड हळूहळू ओसरु लागले आहे.

इंटरनेट हे उत्कृष्टरित्या संगोपन केलेल्या ग्रंथालयासारखे माहितीचे भांडार आहे. आणि कम्युनिकेशनचे प्रभावी माध्यम आहे. कम्युनिकेशनच्या इतर माध्यमांचे अडथळे इंटरनेट मध्ये जाणवत नाहीत. चित्रे, चलतचित्र अक्षरे आणि आवाज यांच्या एकत्रित दळणवळणाचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे इंटरनेट. त्यामुळे एखादा व्यावसायिक त्याच्या व्यवसायाचा पल्ला वाढविण्यासाठी इंटरनेटचा वापर उत्कृष्ट करुन घेऊ शकतो.

पण फक्त इंटरनेटवरुनच खरेदीविक्री करणे ही फार धाडसाची व धोक्याची गोष्ट आहे.

इतर माध्यमांचे अडथळे इंटरनेटमधे जाणवत नसले, तरी इंटरनेटचे स्वतःचे अडथळे आहेतच. सर्वप्रथम

ज्यांच्याकडे कॉम्प्युटर आहे, किंवा ज्यांचा नेटशी टच आहे तेच इंटरनेटवरुन खरेदी विक्री करण्याचा विचार करु शकतात. याचा अर्थ या व्यवसायासाठी ग्राहकाकडे खर्चिक असे इन्फ्रास्ट्रक्चर असले पाहिजे. म्हणजे प्रथमतःच गिन्हाईकांची संख्या मर्यादित झाली असा होतो. दुसरे असे की या माध्यमामध्ये क्षणोक्षणी बदल होत आहेत. हे अजून स्थिर झालेले नाही. व तिसरी व अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंटरनेट हे सुरक्षित माध्यम नाही. इंटरनेट सिक्युरिटी हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय बनलेला आहे. क्रेडिट कार्ड नंबर, चेक नंबर, फोन नंबर या सारखी माहिती इंटरनेटच्या माध्यमातून पाठवणे धोक्याचे असल्याचा अनुभव आहे.

श्री. साबिर भाटिया यांच्या मते एखाद्या व्यक्तीला कमीतकमी पंधरा वेळा जर तुम्ही तुमच्या साईटवर खेचून आणू शकलात तर ती व्यक्ती काही खरेदी करण्याचा विचार करु शकते. या विरुद्ध ग्राहकांना आपापल्या साईटवर खेचण्यासाठी कंपनीज्‌ना खर्च कितीतरी जास्त येतो. त्यामुळे 'इंटरनेटवर खरीदीविक्री' हे मॉडेल फार फायदेशीर नाही.

इंटरनेटच्या धंद्याला लागलेल्या उतरत्या कळेचे दुसरे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे चालक. बऱ्याचशा वेबसाईटस्‌ या अत्यंत अननुभवी अशा तरुण मुलांनी काढल्या होत्या. त्यांना धंद्यातल्या युक्त्या प्रयुक्त्या डावपेच, कायदेशीर भानगडी, मार्केटिंगची बाजू पर्सोनेल मॅनेजमेंट इत्यादी संबंधी काही अनुभवच नव्हता. त्यांचा धंदा बुडाला तर त्यात नवल काय? या संदर्भात नॅप्स्टरची केस अत्यंत महत्त्वाची आहे. कॉपीराईटच्या कायद्याची पुरेशी माहिती नसल्यामुळे ही वेबसाईट चांगल्याच अडचणीत आली होती. शेवटी म्युझिक इंडस्ट्री विरुद्ध नॅप्स्टर यांच्या लढतीचा अंत कोर्टाबाहेर सेटलमेंट होऊन झाला. सनदशीर मार्गाने झाला नाही.

इंटरनेटवरुन ज्यांनी जाहिरात केली त्यांना फार फायदा मिळालाच असे नाही. ज्यांनी गुंतवणूक केली. ते स्टॉक मार्केटमध्ये आपटले. कंपनी काढणारे व्यवसायिक बुडाले. पण मग फायदा झाला कोणाचा? कदाचित फायदा स्टॉक ब्रोकरचा झाला असावा. कारण इंटरनेट बद्दल जितकी आस्था स्टॉक ब्रोकर्स मध्ये होती. तितकी ग्राहकांमध्येही नव्हती. शेवटी धंदा चालवतात ते ग्राहक, शेअर ब्रोकर नव्हे.

असो. आता इंटरनेट स्थिरावत आहे. आणि यापुढील काळात या माध्यमाचे फायदे तोटे, अडीअडचणी स्पष्ट होतील. या व्यवसाया संदर्भात फार मोठे आकडे अजूनसुद्धा प्रोजेक्ट केले जात असले, तरी खरोखरच तितके उत्पन्न मिळवण्यासाठी अनेक वर्षे जावी लागतात. तो पर्यंत आशा करुया, की परिस्थिती बरीच सुधारले असेल. कदाचित एक वेळ अशी येईल की आपण आपले हरगरजेचे वाणसामान इंटरनेटवरुन मागवू.

**वासुदेव देशपांडे**
भास्कर कॉलनी,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५३४११०९.

• • •



# सिरॅमिक पॉटरी - एक व्यवसाय

*सिरॅमिक पॉटरी हे महिलांसाठी एक उत्तम क्षेत्र आहे. त्यातील अनुभव व घटना या लेखात आले आहेत. - संपादक*

चित्रकलेची व गृहसजावटीची मुळातच आवड असल्यामुळे शाळेत असल्यापासूनच आर्कीटेक्ट व्हायचे असे ठरविले होते. परंतु आजकालच्या शिक्षणक्षेत्रातील चढाओढीमुळे बारावीनंतर मला ह्या कोर्सला प्रवेश मिळाला नाही. काहीतरी वेगळे करायचे आणि ज्या क्षेत्रात स्त्रिया जास्त जात नाहीत त्या क्षेत्रात पुढे यायचे असे लहानपणापासून ठरविले होते. कॉम्प्युटर इंजीनियरींगला दुसरे प्राधान्य असल्यामुळे त्या कोर्सला प्रवेश घेऊन डिप्लोमा इंजीनिअर झाले.

कॉम्प्युटर इंजीनियरींग म्हटले की हार्डवेअर व सॉफ्टवेअर हे दोन प्रकार येतात. त्यातही हार्डवेअरमध्ये मला जास्त आवड होती. रीपेअरींग, इन्स्टॉलमेंट इत्यादी कामात स्त्रीयांना जास्त प्रिफर करत नसत. म्हणूनच चांगल्या कंपनीत नोकरी मिळणे कठीण झाले होते. अनुभव मिळण्यासाठी मी एक लहान कंपनी जॉइन केले. तेथे पाच वर्षे चांगला अनुभव मिळाला. परंतु मोठ्या कंपन्यांमध्ये जास्त स्कोप नसल्यामुळे लग्नानंतर दोनच महिन्यांनी नोकरी सोडण्याचा व कॉम्प्युटर क्षेत्रातून बाहेर पडण्याचा धक्कादायक निर्णय मी घेतला. चित्रकलेची आवड असल्यामुळे त्या क्षेत्रात करिअर करायचे असे ठरविले. बेसिक माहिती मिळविण्यासाठी फॅब्रीक पेंटिंगचा आठ दिवसांचा लहानसा कोर्स केला. होलसेलमधून प्लेन रंगीत हातरुमाल आणून ते पेंट करुन विकले. हातरुमालांची गिफ्ट पॅकिटस् करुन विकली. लग्नापूर्वी छंद म्हणून ब्राईडल मेंदी काढत होते. त्याचेच रुपांतर व्यवसायात केले. त्यासाठी लागणारा वेळ मला सासूबाईंनी दिला व सासऱ्यांनी प्रोत्साहन दिले.

लघुउद्योग चालू असताना मी बऱ्याचशा प्रदर्शनांना भेटी दिल्या. मला असलेले पेंटींगचे ज्ञान व अधिक माहिती गोळा करुन माझ्यात असलेली कला प्रदर्शनाद्वारे लोकांसमोर आणावी असा विचार मनात आला. त्यासाठी लागणारे भांडवल घरुन मिळणार होते. परंतु सहजासहजी मिळणारे पैसे वापरताना लिमिट नसते व ते पुरवण्याचा विचार केला जात नाही. म्हणूनच माझ्या लघुउद्योगातून मिळणारे पैसे वापरण्याचा मी निर्णय घेतला. नशिबाने ठरविल्याप्रमाणे मला पैसे मिळत गेले. साड्या, बेडशीटस्, हातरुमाल, टेबलनॅप्कीन पेंट करण्याचा व ब्राईडल मेंदीच्या ऑर्डर मिळत गेल्या. धारावीतून तयार पॉट आणून नंतर पेंटींग व सीरॅमिक वर्क करुन मी दीडशेच्या आसपास पॉट तयार केले. दहा ते पंधरा सीरॅमीक पेंटींग्स तयार केली. जुहू येथील अक्षर आर्ट गॅलरीत मी पहिले प्रदर्शन भरविले. त्यानंतर ग्रीन्डलेज बँकेच्या ब्रीच कँडी येथील शाखेत दुसरे प्रदर्शन भरविले. नवोदित कलाकारांना पुढे आणण्यासाठी ती बँक पंधरा दिवस फ्री आर्ट गॅलरी देत असल्यामुळे मला भाडे पडले नाही. तेथे रिस्पॉन्स मिळाला. आजकाल पॉटवर पेंटींग करणे फारचं कॉमन झाले आहे, परंतु मी वापरणारे मटेरीअल वेगळे असल्यामुळे पॉटला वेगळा इफेक्ट येतो. त्यामुळे त्यात एक वेगळेपणा आहे. हे पॉट वापरुन लॅम्पशेडस् करता येतात. किंवा शो पीस म्हणून त्याचा उपयोग करता येतो. प्रदर्शनात माझ्या सिरॅमिक पेंटींग्जना चांगलाच रिस्पॉन्स मिळाला. सिरॅमिक मटेरीअल वापरुन नाईफ पेंटींगचा इफेक्ट आणल्यामुळे एक नाविन्य म्हणून पेंटींग्जना बरीच मागणी होती. पॉट असो वा पेंटींग, एकदा केलेला पीस मी परत करत नाही. प्रत्येक पीस हा युनिक असतो.

सध्या मी फॅब्रीक पेंटींग व पॉटरीचे क्लासेस घेत आहे. त्याच बरोबर ब्राइडल मेंदी काढणे, बेडशीटस् व साड्या पेंट करण्याच्या ऑर्डर घेते. हे काम मला मनापासून आवडते. म्हणूनच कॉम्प्युटर इंजीनियर असून कला क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय मला चुकीचा वाटत नाही किंवा कॉम्प्युटर इंजीनियरींगची एक सीट वाया घालवून त्या क्षेत्रात काहीच करत नसल्याची खंत मला वाटत नाही.

**सौ. अनुराधा प्रधान**
७३/१०२, सोनचंपा,
वसंत विहार, ठाणे.
दूरध्वनी : ५४२५१२६

• • •

## नवीन पुस्तक

मुलुंडच्या संगणक प्रकाशनाने प्रकाशित केलेली १००१ सर्वोत्कृष्ट वेब साईटस्-डिरेक्टरी व कॉम्प्युटर व्हायरस -स्वरूप आणि उपाय ही श्री. माधव शिरवळकर यांची पुस्तके या विषयांवरील मराठीत अलिकडे आलेली उत्तम पुस्तके आहेत. विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ही पुस्तके घेतलेली आहेत.

श्री. माधव शिरवळकर यांची या पूर्वीची दोन पुस्तके-वेब साईट डिझाईनिंग आणि ईमेल व चॅट ही पुस्तकेही उपयुक्त आहेत. ही देखील विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पहावयास मिळू शकतील.

प्रा. मोहन पाठक यास,

सस्नेह नमस्कार,

'दिशा' मासिक मला खूप आवडले. तुम्ही अगदी आठवणीने, आवर्जून 'वाचनालयातील वाचक आणि वाचन' यावरील माझा लेख 'दिशा' मध्ये प्रसिद्ध करुन मला मासिक पाठविले. तसेच सदरील मासिकातील माझ्या लेखापेक्षा मला विजया वाड यांचा 'स्त्री शक्ती' या विषयावरील लेख अप्रतिम वाटला. तसेच 'शिक्षण क्षेत्रात माफिया' हा नितीन अभ्यंकर यांचा लेख हे लेख मला व आमच्या कुटुंबातील सर्वांनाच आवडले.

मला लेखन करण्याची खुप आवड आहे! आपल्या प्रोत्साहनामुळे मी काही अजून चांगले लिहिण्याचा प्रयत्न करीन.

आपली विद्यार्थीनी

**निशा चंद्रकांत जाधव**
६१, कारोरी, भिवंडी

'दिशा' चा अंक कसा वाटला, काय आवडले, काय नाही या बद्दल अवश्य लिहून कळवा. आपल्या प्रतिक्रियांचा अंक अधिक चांगला करण्यास निश्चित उपयोग होईल.

- संपादक

# 'स्वामी : एक शोध'

रणजित देसाई यांची 'स्वामी' ही ऐतिहासिक कादंबरी मराठी कादंबऱ्यांच्या इतिहासामधील एक महत्वाचा टप्पा (landmark) मानला जातो. मुळात ऐतिहासिक संदर्भ देताना असावे लागणारे ऐतिहासिक वास्तवाचे भान आणि कादंबरी लेखनामध्ये अपेक्षित असणारी कल्पना रम्यता, रंजकता यांची सांगड घालता येणे कठीण आहे. तरीही ऐतिहासिक सत्याशी शक्यतोवर इमान राखून इतिहासामधील घटना व पात्रांच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याची परंपरा तशी जुनीच म्हणावी लागेल. हरि नारायण आपटे, रा.भि. गुंजीकर इ. जुन्या लेखकांनी त्या काळाला धरून केलेले ऐतिहासिक कादंबरी लेखनाचे प्रयोग सर्वज्ञात आहेत. साठोत्तरी मराठी साहित्यामध्ये हा प्रवाह पुन्हा निर्माण झाला व या प्रवाहाची सुरुवात (कै.) रणजित देसाई यांच्या या कादंबरीने केली. १९६२ साली आलेल्या या कादंबरीचे २८ वर्षात २१ वेळा पुनर्मुद्रण झाले. कादंबरी, कथा, कविता, नाटक अशा ललित साहित्य प्रकाराच्या पुनर्मुद्रणाला आवृत्ती मानण्याचा प्रघात असला तरी तो बरोबर नाही. प्रती संपल्यानंतर मूळ संहितेत कालानुरुप काही बदल केलेले असतील तर त्यास आवृत्ती म्हटले पाहिजे. पण ललित साहित्याबाबत असा मूळ संहितेत बदल क्वचितच केला जातो.

'स्वामी' नंतर स्वतः रणजित देसाई यांनी 'श्रीमान योगी', 'छावा' अशा काही कादंबऱ्या लिहिल्या. ना.सं. इनामदारांनीही 'झेप', 'झुंज' इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. परंतु 'स्वामी' इतकी लोकप्रियता इतर कोणत्याही पुस्तकास मिळाली नाही. या लोकप्रियतेचे एक गमक म्हणजे वारंवार होणारी पुनर्मुद्रणे तर दुसरे गमक म्हणजे सातत्याने त्या कलाकृतीवर, पुस्तकावर विविध दृष्टिकोनामधून समीक्षात्मक टीकात्मक किंवा रसग्रहणात्मक लेखन प्रकाशित होत रहाणे हे होय! १९६२ नंतर गेली ३० वर्षे स्वामी कादंबरीवर लहान मोठे समीक्षक बरी वाईट समीक्षा सातत्याने करीत आहेत व त्यामुळे कित्येक पिढ्या गेल्या तरी 'स्वामी' ला मागणी आहे. याचा एक परिणाम असा होतो की, एखादे पुस्तक इतकी वर्षे वाचले जात आहे, ते एक महत्त्वाचा टप्पा आहे, त्यामुळे मराठी साहित्याचा पदवी व पदव्युत्तर स्तरावर विविध विद्यापीठांमध्ये जो अभ्यास केला जातो, त्या अभ्यासाच्या अभ्यासक्रमांमध्ये अशी पुस्तके वारंवार लावली जातात. स्वाभाविकतः वेगवेगळे विद्यार्थी अनेक दृष्टींनी अशा साहित्य कृतींचा अभ्यास करतात.

असा अभ्यास करताना आजवर या पुस्तकाबद्दल कोणी, कोठे व काय लिहिले आहे यावर परीक्षणात्मक लेख कोणकोणत्या नियतकालिकांतून आलेले आहेत याचा संदर्भ शोध ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने किचकट असली तरी गरज होऊन बसते. त्यामुळे उपलब्ध असणाऱ्या सर्व साहित्याचा धांडोळा घेऊन, अशा साहित्यामधून आलेले साहित्य साक्षेपाने निवडून, निवडलेल्या साहित्याचे संपादन करून या साहित्यावर आधारित ग्रंथ उपलब्ध असणे ही गरज ठरते. मराठी पुरते बोलावयाचे झाल्यास 'बाईडरचे दिवस' हे पुस्तक किंवा घाशीराम कोतवाल वरील पुस्तक, वासूनाका सांगोपांग ही पुस्तके अशा स्वरुपाची आहेत. अशी पुस्तके अभ्यासकाची सोय तर करतातच, शिवाय साहित्यामध्ये दिशापूर्ण भर टाकतात.

'स्वामी' एक शोध हे डॉ. मीरा घांडगे यांनी संपादित केलेले हे पुस्तक हे असे महत्त्वाचे ठरू शकेल असे पुस्तक आहे. सदर शोध ग्रंथाची संपादिकेची प्रस्तावना अतिशय महत्त्वाची आहे. मुख्य म्हणजे स्वामी कादंबरीतील भाषा आणि रमा-माधव दांपत्याचे चित्रण यावर अनेकांनी टीका

केली आहे, या मुद्यांचा परामर्श प्रस्तावनेत घेण्यात आला आहे. स्वामीच्या लोकप्रियतेचा विचार करताना डॉ. घांडगे म्हणतात, ''कादंबरीची लोकप्रियता तिच्या शीर्षकात आहे''(पृ. १५), 'स्वामीच्या लोकप्रियतेत रणजित देसाईंच्या लेखन शैलीचा प्रभाव आहे'' (पृ. १६), 'स्वामीच्या यशामागे आणखी एक कारण म्हणजे रमा-माधवांचे संसारी जीवन .......'' (पृ. १८) ही तीनही कारणे महत्त्वाची आहेतच शिवाय सर्वसाधरणत: शोकांतिका मराठी माणसालाच नव्हे तर कोणालाही भावते हे ही महत्वाचे मानसशास्त्रीय कारण आहे.

या ग्रंथात डॉ. घांडगे यांनी निवडलेल्या एकूण २९ लेखांचे तीन वर्गात विभाजन केले आहे. 'स्वामी' या कादंबरीवरील लेख (२१), रणजित देसाई आणि स्वामी (४ लेख) व रणजित देसाई विषयी (४ लेख). लेखांच्या निवडीसाठी डॉ. घांडगे यांनी वापरलेले साहित्य व या टीका लिहिणारे लेखकही समीक्षक म्हणून मान्यताप्राप्त असे आहेत. या साहित्याची संदर्भ सूची पृ. २०५ व २०६ वर दिलेली आहे. आलोचना, युगवाणी, प्रतिष्ठान आदी साहित्य संस्थांच्या नियतकालिकांबरोबरच धार आणि काठ सारखा महत्त्वपूर्ण ग्रंथ, स्वामी एक रुपवेध हा पंडित आवळीकरांचा ग्रंथ, तरुण भारत, महाराष्ट्र टाईम्स, मराठा अशी वृत्तपत्रे असे विविध साहित्य त्यांनी वापरले आहे. या सर्व साहित्यात 'स्वामी' चा सर्वांगाने व सर्वंकष विचार केला गेलेला दिसतो. स्वामीची शोकांतिका म्हणून असणारी समीक्षा (म.श्री. दीक्षित) स्वामी आणि पेशवेकालीन मराठी (म.वा. धोंड), अशा लेखातून एका विशिष्ट दृष्टीने जसा विचार झालेला आहे तसाच काही लेखांमधून व्यक्तिचित्रण, प्रसंग व वातावरण निर्मिती इ. दृष्टींनी सर्वंकष विचारही झाला आहे.

मात्र 'स्वामी' आणि ऐतिहासिक कादंबरी हा साहित्यप्रकार, रणजित देसाई -लेखकाभ्यास या दृष्टीने विद्यापीठांमध्ये पीएच्.डी. साठी संशोधन झालेले असण्याची पूर्ण शक्यता आहे. अशा प्रबंधांची सूची, त्यांच्या संशोधक मार्गदर्शकांच्या नाव पत्त्यासह देता येणे शक्य होते. अभ्यासकांची सोय होण्याच्या दृष्टीने डॉ. घांडगे यांचा हा ग्रंथ उत्तम आहेच, पण यात परिशिष्टांचा वापर करून ऐतिहासिक कादंबरी या साहित्य प्रकाराच्या अभ्यासाला उपयुक्त असणाऱ्या साहित्याची सूची देता येणे शक्य होते. तसेच या संशोधनपर प्रबंधांमध्ये वापरले गेलेले संदर्भ साहित्य याबर एक उत्तम लेख आणि या समग्र साहित्याची सूची देखील देता येणे शक्य होते. एखाद्या ग्रंथाचा अभ्यास करताना त्याच्या प्रकाशन इतिहासाचा तांत्रिक तपशील ही देता येतो. स्वामी प्रथम प्रकाशित झाली तेथ पासून प्रत्येक प्रकाशनाचे वर्ष, प्रकाशक, पृष्ठे इ. सर्व माहिती अभ्यासात परिपूर्णता येण्याच्या दृष्टीने व संदर्भ म्हणून या शोध ग्रंथाचे मोल वाढविणारी ठरली असती. महत्त्वाचे म्हणजे या ग्रंथाला व्यक्तीनाम निर्देश सूची असणे अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक होते.

अशा त्रुटी असूनही डॉ. घांडगे यांचा हा ग्रंथ उपयुक्त ठरणारा आहे हे मान्य करावे लागेल. 'स्वामी' सारख्या ग्रंथांचा अभ्यास होत रहाणारच असतो. त्या अभ्यासाला हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल व म्हणूनच प्रत्येक मराठी अभ्यासकाने दखल घ्यावी असा हा ग्रंथ झाला आहे.

- 'स्वामी : एक शोध'
- संपादन व प्रस्तावना -डॉ. मीरा घांडगे,
- पुणे, मेहता पब्लीशिंग हाऊस, २००१
- मूल्य-रु. १५०/- पृष्ठे २०६.

- ग्रंथपाल

•••

# गुंफण

*आकाशवाणी वरील चिंतन कार्यक्रमा प्रमाणे अंतर्मुख करणारे हे चिंतन- संपादक*

**'जिज्ञासेतच खरा आनंद लपलेला असतो''**

खरंच, माणूस एखाद्या ध्येयाने पछाडलेला असेल तर तो आपल्या जीवनात उत्क्रांती घडवू शकतो. उदाहरण द्यायचे झाले तर आकाशवाणीवरील 'चिंतन' या कार्यक्रमात एकदा सांगितले की , एका मुलाला शिक्षण घेण्याची खूप इर्षा निर्माण झाली. त्यासाठी आपल्या गावात जवळपास शाळा नसल्यामुळे त्याने आपले घर सोडले. शाळेची फी भरायला, वह्या-पुस्तके घ्यायला जवळ पैसे नव्हते, म्हणून एका वर्गाच्या बाहेर बसून जे ऐकायला येईल ते तो ग्रहण करायचा. त्या शाळेतील शिक्षकांच्या ते लक्षात येऊन त्याची जिद्द बघून त्याला फी माफ केली गेली. वह्या-पुस्तके दिली गेली. पुढे तो मुलगा खूप शिकला. आज त्यानेच कितीतरी शिक्षण संस्थांची उच्च पदे विभूषित केलेली आहेत. वरील गोष्टीवरून मायकेल अँजेलो यांच्या 'छोट्या छोट्या गोष्टींनीच पूर्णत्व येते आणि पूर्णत्व ही काही छोटी गोष्ट नाही'' या म्हणण्यास दुजोरा मिळतो.

म्हणजेच महत्त्वाकांक्षेला प्रयत्नाची जोड असेल तरच यशाची अपेक्षा करता येईल. तसेच ज्ञान हे पैशापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण पैशाचे रक्षण तुम्हाला करावे लागते, परंतु ज्ञान तुमचेच रक्षण करते, हे लक्षात घेतले पाहिजे. शिवाय दिल्याने कमी न होता वाढत जाणारे ज्ञान जीवनातील अंध:कार दूर करते. म्हणून मधमाशी प्रमाणे ज्ञानरूपी मध गोळा करा. जो तरुण सतत नवे शिकण्याची व प्रगती करण्याची सवय लावून घेतो, तो खरोखर सुखी असतो. तरी 'आपला भाग्यविधाता ईश्वर वगैरे कोणी नसून आपण स्वतःच आहोत' हे मानवेंद्रनाथ रॉय यांचे म्हणणे योग्यच आहे. तसेच 'उत्साह आणि उमेदी खेरीज कोणतीही गोष्ट साध्य करता येत नाही.'' हे इमर्सन यांचे विचार पोषकच आहेत.

उद्योग यंत्रेही निर्मावी । परदेशी भीक न मागावी ॥
आपण करोनि भोगावी । वैभवे सारी ॥

हे संत तुकडोजी महाराज यांचे बोधवाक्य विचार करायला लावणारे आहे. म्हणजेच केवळ जगण्यापेक्षा कसे जगावे याला फार महत्त्व आहे.

**श्रीमती अपर्णा काजरेकर**
ठाणे.

•••

BANGALORE



*Vidhana Soudha*

# पुस्तकांच्या दुनियेतील मुसाफिरी

*ग्रंथनिर्मिती ते वाचक या प्रवासातील अनुभव ग्रंथ प्रेमी श्री. ल. टिळक यांनी शब्दबद्ध केले आहेत. - संपादक*

सहल, प्रवास, भटकंती, मुसाफिरी म्हटली की चटकन मनात येते ती आनंदाची पर्वणी. मग, मुसाफिरी कुठलीही असो. त्यात ती मुसाफिरी पुस्तकांच्या दुनियेतली असली तर आनंदी -आनंदच हवा.

आपल्या पुस्तकांच्या मुसाफिरीत कोण कोण भेटणार हे आपणास ठाऊक आहे का ? नसले माहीत तर डोक्याला ताण देऊ नका. फिरता फिरता कळेलच आपोआप!

पहिली भेट लेखकाची कारण त्याने लिहिले तर पुढचे सर्व भेटणार. तो केव्हा लिहितो, तर ज्यावेळी त्याची प्रतिभा त्याला स्वस्थ बसू देत नाही - त्याला लिहिल्याशिवाय चैन पडत नाही. अशावेळी तो लिहितो. लिहितो, तेव्हा ते छापलेच जाईल असे त्याला वाटत नाही. अशावेळी तो आपल्याला सांगतो की, ' मी आत्मानंदासाठी लिहितो', परंतु त्याला खरा आनंद होतो तो त्याने जे काय लिहिले आहे ते छापून येते तेव्हाच ! आणि छापून घेण्याची ही इच्छा प्रबळ झाली की तो शोध घेतो, तो प्रकाशकाचा.

हस्तलिखित तयार करणे, ते प्रकाशकाला दाखवून त्याला पसंत पडे पर्यंत त्याच्याकडे हेलपाटे घालणे, पसंतीस आल्यास प्रतींची संख्या, मानधनाबद्दल चर्चा करणे, इत्यादी गोष्टी करून लेखक हैराण होतो. म्हणूनच काय - 'बायरन' याने, आपला प्रकाशक 'मरे' याला बायबलची प्रत भेट म्हणून दिली त्यात एक वाक्य - 'बॅराबस हा दरोडेखोर होता' असे आहे, त्या वाक्यातील 'दरोडेखोर' हा शब्द खोडून त्या ठिकाणी त्याने 'प्रकाशक' अशी दुरुस्ती केली व ती प्रत प्रकाशकाला दिली. हे उपरोधिक उदाहरण आपण सोडून देऊ. कारण, मला अभिनव प्रकाशनाचे प्रकाशक (कै.) वामन विष्णु भट यांना स्नेह लाभला. तेव्हा प्रकाशकांच्या नेमक्या व्यथा आणि कथा समजल्या.

त्यांचा माझा परिचय 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' च्या वास्तूत झाला व तो सुद्धा अविस्मरणीय कारणामुळे. ओळखीचा हा किस्सा वाचण्यासारखा आहे.

** ** **

वा.वि. भट हे मुं.म.ग्रंथसंग्रहालयाच्या नायगाव शाखेचे कार्यवाह होते. मी केवळ वाचक सभासद होतो. सभासद स्वतःकडे वाजवी पेक्षा अधिक दिवस पुस्तके ठेवतात व अन्य सभासदांची कुचंबणा करतात; म्हणून त्यांनी फतवा काढला की, 'पुस्तक आठ दिवसात परत करावे' अन्यथा प्रत्येक दिवसाला दहा पैसे दंड आकारला जाईल. नुसताच फतवा न काढता, त्याची अमंलबजावणी सुद्धा केली. त्यामुळे तीन-तीन पाळ्यामध्ये काम करणाऱ्या, श्री. देशपांडे या माझ्या मित्राने सूचना वहीत सूचना लिहिली की, कामाच्या गडबडीत पुस्तक बदलण्याची नेमकी तारीख लक्षात रहात नाही, तेव्हा पुस्तक बदलण्याची तारीख असलेली 'स्मरण चिठ्ठी' पुस्तकाच्या सुरुवातीस चिकटवावी. 'वा.वि.' नी सूचना 'कार्यवाह' या नात्याने वाचली व त्या पुढे कोणताही शेरा न देता सही केली-म्हणजे पर्यायाने ती सूचना स्वीकारली.

महिना झाला तरी स्मरणचिठ्ठी लावण्याची व्यवस्था झालेली नव्हती. परिणामी माझ्या मित्राला पुन्हा दंड भरावा लागला. हे सर्व त्याने मला सांगितले. मी जेव्हा त्यानंतर ग्रंथालयात गेलो तेव्हा सूचना वहीत लिहिली की, ' हा

वहीतील सूचना वाचल्या जातात. 'र' कारात्मक सही केली जाते, पण प्रत्यक्षात अंमलात आणल्या जात नाहीत. तेव्हा सूचना वही बंद करून संस्थेचा त्यासाठी होणारा खर्च वाचवावा.'

'बावि' नी माझी सूचना वाचली व मला प्रत्यक्ष भेटावयास सांगितले. १९५५ साली झालेल्या भेटीतून आमचा जो स्नेह जडला तो इ.स. २००० मध्ये ते दिवंगत होई पर्यंत कायम राहिला. ह्या मैत्रीमुळे -प्रकाशक नेमका काय करतो, त्याच्या व्यवसायाचे फायदे तोटे काय हे सर्व मी जवळून पाहिले आहे; आणि त्यावरून एक विधान मी अवश्य करीन की, बावरने प्रकाशकांना, दरोडेखोरांच्या रांगेत बसविले आहे तितके ते निश्चितच वाईट नाहीत. असो.

** ** **

प्रकाशकाला लेखकाचे लेखन पसंत पडले व लेखकाशी व्यावहारिक देवाणाची-घेवाणाची चर्चा झाली की प्रकाशक गाठ घेतो ती मुद्रकाची.

गंमत म्हणजे, ह्या मुद्रक मंडळीं साठीही एक विशेष व्याख्या आहे. ती अशी - 'लेखकाने जे पांढऱ्यावर काळे केले असते ते अधिक काळे करून दाखवितो तो 'मुद्रक'.

१९व्या शतकातला इंग्लडमधला 'कॅक्स्टन' या गृहस्थाला मुद्रणकलेचा जनक मानतात. ही कला आता एवढी प्रगत झाली आहे की, मुद्रण हे ज्ञानप्रसाराचे प्रभावी शस्त्र झालेले आहे. राष्ट्राची संस्कृती, इतिहास, धर्मविचार यांना चिरंतन स्वरुप देण्याचे कार्य मुद्रक करीत असतात. त्यामुळे लेखकाचे हस्तलिखित छापले गेले की, लेखकही लोकांच्या मनात चिरंतन होतो.

पुस्तके छापून झाली की, ती गोदामात ठेवून चालत नाही. ग्रंथांचा खरा आश्रयदाता असतो ग्रंथविक्रेता-त्याचे कसब, लोकांना काय आवडते ते खपविण्यात नसते तर, आपल्या दुकानात जे ग्रंथ आहेत त्या बद्दल लोकांच्या मनात आवड निर्माण करून ते खपविण्यात असते. पुस्तकांची खरेदी करणारे लोक हुशार असतात. ते ग्रंथाबरोबर ग्रंथ विक्रेत्याची सुद्धा पारख करतात. विक्रेता मनमिळाऊ व खरेदीवर सूट देत असला तर ते तिथे सातत्याने खरेदी करतात, हे आपणास ठाऊक असेलच!

मुसाफिरीतील पाचवे स्थान वाचकाचे. 'ग्रंथांचे सविस्तर वाचन न करता, एखादाच ग्रंथ चाळून सबंध वाङ्मयाचे मूल्यमापन करणारा तो वाचक' ही 'वाचका' ची उपरोधिक व्याख्या.

पुस्तक विक्रेता हा ग्रंथांचा आश्रयदाता, तर वाचकांना ग्रंथांचे हितचिंतक म्हटले जाते व हे विधान खरे ठरविण्यासाठी, आपल्या व्यक्तिगत अंदाज पत्रकात, दरमहा यथा शक्य रकमेची तरतूद 'ग्रंथखरेदी' साठी प्रत्येकाने केली पाहिजे. एकट्याने ग्रंथ विकतघेणे अवघड वाटत असेल तर ग्रंथखरेदी सामुदायिकरित्या करावयास हवी. ग्रंथांची आवड निर्माण होण्यासाठी नियतकालिकांची खरेदी व वाचन हेही उपयुक्त ठरेल. कै. अ.र. लिमये यांनी 'ग्रंथव्यवहार' ह्या आपल्या ग्रंथात म्हटले आहे की - 'मराठी वाङ्मयाचे भवितव्य वाचकांच्या हाती आहे व समाजाचे स्थैर्य वाङ्मयाच्या हाती आहे'.

मुसाफिरीतील महत्त्वाचा दुवा 'वाचक' आहे. तेव्हा वाचक ह्या नात्याने आपल्या संग्रहात असलीच पाहिजेत - किमान ती आपण वाचलीच पाहिजेत अशा ५०/१०० पुस्तकांची यादी देण्याचा मोह जागेअभावी आवरून धरतो, परंतु तशी कोणी विचारणा केली तर ती यादी त्याला अवश्य देईन-ह्या आश्वासनासह हा लेख इथे पुरा करतो.

**श्री. ल. टिळक**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन,
जांभळी नाका, ठाणे.

•••

# एक साधारण निबंध संग्रह

गोविंद पुरुषोत्तम देशपांडे यांचे 'चर्चक निबंध' वाचले. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर व ग्रंथनाम पृष्ठावर 'रहिमतपुरकरांची निबंधमाला-२' असा उल्लेख आहे. हा उल्लेख काय आहे, का आहे निबंधमाला-२ असेल तर १ काय आहे वगैरे कोणताही खुलासा पुस्तकात नाही. देशपांडे यांचे मूळ गाव रहिमतपूर. म्हणून हा उल्लेख असावा. या निबंध संग्रहात १५ निबंध आणि ५ परिशिष्टे आहेत. परिशिष्ट दोन (पृ. १५०) मध्ये अरुण शेवते यांनी 'आपुलाच संवाद आपणाशी' या शीर्षकाखाली प्रामुख्याने नाटककार म्हणून घेतलेली श्री. गोविंद पु. देशपांडे यांची मुलाखत आहे. या मुलाखतीत श्री. शेवते यांनी पृ. १५३ वर एक प्रश्न विचारला आहे. या प्रश्नातील विधान गो.पु. देशपांडेच्या संदर्भात महत्त्वाचे आहे. ते असे, 'आपण ज्या एका वैचारिक भूमिकेतून नाट्यलेखन करता, ती वैचारिक भूमिका लोकांपर्यंत पोहचत नाही.' हा अनुभव पसरट शैली, विषयांतर करीत लिहिण्याची पद्धत, अनेकवार असो. परंतु असे म्हणत मूळ विषयाचे सूत्र पकडण्याचा केलेला प्रयत्न असे दोष असणाऱ्या या १५ निबंधातून अनेकवार येतो. त्यामुळे निबंधाच्या नेमकेपमणा, आशयबद्ध मांडणी यात अभावाने आहे. याचा परिणाम हे पुस्तक सलग पणे वाचावेसे वाटत नाही यात होतो.

हे १५ 'चर्चक निबंध' व यातील परिशिष्टे ही प्रासंगिक स्वरूपाचे लेखन आहे. या निबंधाच्या शेवटी पूर्वप्रसिद्धीचा तपशील दिलेला आहे. विषयात वैविध्य असले तरी साहित्य व समाजाच्या अंतर्गत नातेसंबंधाचे सूत्र विषयात आहे. उदा. दलित साहित्य, साडेतीन टक्क्याचे साहित्य इ. लेख.

गो.पु. देशपांडे यांचा व्यासंग हा प्रामुख्याने पाश्चात्य साहित्याचा. मराठीपणा पेक्षा भारतीयत्व महत्त्वाचे असे त्यांना वाटते. दिल्लीच्या वास्तव्याचा त्यांच्या एकूण अभिरुचीवर परिणाम झालेला. प्रामुख्याने नाटककार अशी जरी त्यांची ओळख असली तरी त्यांना जाणवणारी संघर्षांची रूपे सामान्य प्रेक्षक/वाचकाच्या दृष्टीने क्लिष्ट आहेत व हीच क्लिष्टता याही निबंध संग्रहात अनेक ठिकाणी जाणवते.

विषयाचे भान, त्या विषयाच्या संदर्भात लागणारा अभ्यास हे सर्व या निबंधात आहे. पण चर्चा करण्याच्या नादात ते इतके इकडे तिकडे करतात की वाचकांची त्या विषयावर पकड रहाणे कठीण होते. उदा. ग्रंथाला दिली ओसरी हा निबंध. आपल्याला ग्रंथ संग्रहाचे व्यसन कसे लागले, आपली ग्रंथ निवड कशी असते हे सांगता सांगता मध्येच माझे जर्मन कसे बेताचे आहे, बुडहाऊसचा उपविषय, हेगेल ज्ञानेश्वरांवरील विचार हे सर्व अनावश्यक वाटायला लागते. आपण विषय सोडून बाहेर जात आहोत या जाणिवेचे त्यांच्या मनावर ओझे असल्याचे वाचकालाही जाणवते. पृ. १२० वर याच निबंधात त्यांचे एक वाक्य फार बोलके आहे. ''पुस्तकांच्या पहिल्या भेटी मैत्रिणींच्या पहिल्या भेटीसारख्या लक्षात राहणाऱ्या असतात'' हे वाक्य अतिशय सुरेख आहे, परंतु सबंध निबंधात त्यांनी वर्णन केलेल्या चार दोन पुस्तकांच्या पहिल्या भेटी मनात अशा रुंजी घालणाऱ्या वाटत नाहीत. एखाद्या ग्रंथाने आपल्यावर काय संस्कार केला, तो ग्रंथ आपल्या संग्रहात कसा आला, कसा कायम झाला अशा पद्धतीने कितीतरी लिहिता आले असते. पण या काव्यात्म होऊ शकणाऱ्या विषयाची गो.पु. देशपांडे नी केलेली 'चर्चक' मांडणी मुळीच वेधक वाटत नाही.

विषयांचे वैविध्य व त्या अनुषंगाने काही तुरळक संदर्भ सापडणाऱ्याच्या दृष्टीने हे पुस्तक उपयुक्त म्हणता येईल. मात्र निबंध संग्रह म्हणून विचार महत्त्वाचे असूनही निबंधाचा घाट नीट न जमलेले असे पुस्तक आहे.

- चर्चक निबंध-गो.पु. देशपांडे
- मुंबई, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, १९९९
- पृ. १७६ मूल्य : १५०/-

-ग्रंथपाल

•••

# जैसे चित्त जयावरती

*मन विषण्ण करणारा अनुभव गुरुसारखाच श्रेष्ठ असतो. अजिबात प्रेम न करण्यापेक्षा प्रेम करून पराभूत झालेलं पत्करलं. ज्यावर चित्त जडतं, त्या भावनेचा मोठेपणा कळल्यावर आपणही मोठे होतो !- संपादक*

माणसं आपल्या आयुष्यात येतात. काही काळ राहतात निघून जातात. आपणही अनेकांच्या विश्वात जातो. रमतो... अन् निघून जातो. एखादीच अशी व्यक्ती असते की, जिनं आपलं विश्व मोहरून गेलेलं असतं. नको ती माणसं आपल्या जीवनात, लुडबूड करत राहतात. हवीहवीशी मात्र क्वचितच आपली होतात. ती बहुधा दुसऱ्या कुणाची असतात. या साऱ्या कळवळ्याच्या जाती अनाकलनीय असतात. वात्सल्य, मैत्री आणि प्रेम या भावनांची कधी कधी गल्लतही करतो आपण !

**'शिकों कळा शिकों येती ।**
**प्रेम नाहीं कोणां हातीं ॥'**

असं तुकोबांनी म्हटलयं. अनेक कला शिकविल्यानंतर येतील. पण प्रेम कुणाला शिकवून असं देता येणार नाही. जशी बुद्धी असते, तशी सिद्धी प्राप्त होते.

एखाद्या छोट्या दोस्ताबद्दल आपलं वात्सल्य पाझरतं. त्याच्या बाळलीलात आपण लहान होऊन भाग घेतो. त्याचा 'घोडा होतो. त्याला खाऊ देतो. त्याला गोष्टी सांगतो. नंतर तो छोटा दोस्त मोठा होतो. त्याला घोडा नको, गाडी हवी असते. त्याला खाऊ नाही, पार्टी हवी असते... अन् गोष्टी नाही तर कथा ऐकतो. कालांतरानं त्याच्याबद्दल पाझर आटून जातो.

बालमित्रांमध्ये मन गुंतलेलं असतं मोठं झाल्यावर प्रत्येकाच्या वाटा बदलतात. नवे मित्र लाभतात... हे चक्र चालूच राहतं प्रेमाचं मात्र तसं नसतं. त्याची व्याख्या जशी करता येत नाही, तसंच ऐकून-बोलूनही कळत नाही.

**'अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं ।**
**मुकास्वादनवत् ॥'**

ते शब्दातीत असतं म्हणून अनुभवायच असतं. प्रेमशून्य जीवन जगणाऱ्यांनी केवळ निंदाच करावी. निष्प्रेम जिण्याची नौका पैलतीरावर पोचण्याऐवजी बुडालेली बरी!

**'प्रेम नये बोलता**
**सांगता दाविता**
**अनुभव चित्ता**
**चित्त जाणे ॥'**

प्रेमाशिवाय जगणं अशक्यच असतं. मग ते प्रेम सजीवावर जसं असू शकतं-तसं ते निर्जीवावरही असू शकतं. स्वतः च्या कलेवर प्रेम करून कलावंत एकटाच मस्तीत जगू शकतो. खरं तर माणूस अनेक गोष्टींवर प्रेम करून अखेर एकटाच उरतो. सर्वांमध्ये मन गुंतवण्यातला फोलपणा त्याला उत्तरकालात जाणवलेला असतो. कुणी आपल्या छंदावर जीव ओवाळून टाकतो. कुणी अभ्यासाशिवाय कशात जीव गुंतवतच नाहीत. जिवास जीव द्यावा, असा कुणी भेटावा. त्यासाठी काय करावं लागतं ?

**'प्रेमेवीण श्रुतिस्मृतीज्ञान**
**प्रेमेवीण ध्यानपूजन**
**प्रेमेवीण श्रवणकीर्तन**
**वृथा जाण नृपनाथा ॥'**

असं एकनाथांनी म्हटलयं. साक्षात परमेश्वरही प्रेमाचा भुकेला असतो तर माणूस का असणार नाही ? त्याच्या स्वरूपात सहज प्रेमानं मिसळून जाणं, हीच श्रेष्ठ भक्ती होय. कायावाचामनेकरून देवाला प्रेम समर्पण करावं,

तेव्हा तो नित्य जवळच असल्याचा प्रत्यत येतो. हीच आत्मानुभूती. प्रेमाचा 'अमृतानुभव' यापेक्षा वेगळा तो काय असणार ? मनात प्रेमाचा 'लव' लेश नसूनही स्वतःला प्रेमळ म्हणवणारे दांभिकही आपल्याला भेटतातच ना ?

**'प्रेम नाहीं अंगीं ।**
**भले म्हणविले जगीं ॥'**

माणसांच्या कृत्रिम जिव्हाळ्यातला नाटकीपणा कळायला मात्र हवा. मधाळ बोलून फसविणारे असतातच. त्यासाठी लागतं 'अखंड सावधपण!'

'घनःश्याम सुंदरा....' ही अमर भूपाळी लिहिणारा 'होनाजी' ह्यानं आपल्या जिवलग मित्राची आठवण म्हणून 'बाळा' हे नाव लावलं. सुदामा आणि पेंद्या हे कृष्णाचे बालमित्र. आपल्या मनातही अशा प्रामाणिक मित्रांची अपण पूजा करतो. 'काम हाच आपला छंद' म्हणणारे 'बजाज' ह्या उद्योगपतीच्या यशाचं रहस्य वेगळं सांगायला नको. शास्त्रज्ञांच्या समाधिसुखाचं गुपितही हेच असतं. संशोधन हाच त्यांचा सोबती असतो.

**'खरा है दर्द का रिश्ता**
**तो फिर जुदाई क्या**
**जुदा तो होते है वह**
**खोट जिनकी चाह में है ॥ '**

असं 'दोस्ती' च्या गाण्यात शायरनं म्हटलयं.

प्रेमाचं प्रकरण मात्र वेगळं असतं. दोस्तीसारखं ते रासवट नसतं. नाजूक असतं 'लैला-मजनू' नामक प्रेमकथा साऱ्या जगाला ठाऊक आहे. 'रोमिओ-जुलिएट' ही काही अनोळखी नाहीत. उलट इतक्या परिचयाच्या आहेत त्या साहित्यकृती आहेत- काल्पनिक आहेत, हेही लाखो प्रेमिकांना ठाऊक नाहीए !

महाराष्ट्रात उदंड प्रेमकविता पैदा होते. पण सामान्य प्रेमकथाच रोज घडताना दिसतात. 'मस्तानी-बाजीराव' ही एकमेव प्रेमकहाणी. त्यावरलही तुच्छतेने बोलणारी दीड शहाणी मराठी माणसं उदंड भेटतात. प्रेमप्रकरणाला विरोध करण्यासाठीच आपला जन्म झालाय, असं उद्दटपणे म्हणणारे विद्वान या प्रेमभूमीत काय कमी आहेत का ? स्वतः प्रेमविवाह करायचा. मुलामुलींच्या प्रकरणाला मात्र 'लफडं' म्हणून हिणवायचं. 'संस्कृतिरक्षक' नामक जातीचे हलकट जीव जेवढं संस्कृतीचं वाटोळं करतात, तेवढं समाजकंटकही करत नसतील. मस्तानीला याच महाराष्ट्रानं जगणं नकोसं केलं होतं. तीच मस्तानी बाजीरावाला पानिपतच्या रणसंग्रामात पाणी देण्यासाठी जात होती. धर्मपत्नीचं प्रेम तेव्हा शनिवार वाड्यात सुरक्षित होतं. तिला विचारलं होतं बाजीरावनं , 'येणार का?' तिनं घाबरुन म्हटलं होतं, ' कशाला?'.

मस्तानीला विचारल्यावर ती क्षणात 'हो' म्हणाली होती. इथं प्रामाणिक प्रेमाच्या परीक्षेत मस्तानी प्रथम श्रेणीत उत्तिर्ण झाली होती ! प्रेमाच्या माणसांची पारखही अशीच होते.

बाजीप्रभूनं आपल्या शिवरायांसाठी खिंडीत दिलेला लढा अशाच स्वामीप्रेमाचा पुरावा आहे. 'ताजमहल' वर शहाजहानचा इतका जीव जडला होता की, ज्यानं त्याचा आराखडा तयार केला होता, त्याचे हात कलम केले होते ! दुसरा 'ताज' जगात कुणी बांधू नये म्हणून. असे असंख्य बळी 'प्रेमा'ला ही हवे असतात. अन्यथा प्रेमभंगाच्या अपार दुःखापायी प्रेमिकांनी आत्महत्या केल्या नसत्या. प्रेमीजन वेडे झाले नसते.

खरं तर वेडं व्हायचं म्हणजे बुद्धीला रजा द्यायची ! पण कलियुगाच्या कलहप्रिय काळात 'व्यवहार' हाच एकमेव पुरुषार्थ असल्यानं डोळसपणे प्रेम करणारे अधिक दिसतात. श्रीमंत, उत्तम उद्योगव्यवसाय, देखणेपण, स्वतःची स्थावर-जंगम मालमत्ता ..... हे सारं बघून प्रेमात 'पडणारे' जीव अधिक वाढले आहेत. तितकचं महत्त्व शिक्षणालाही आलयं. त्यामुळे प्रेमाचा व्यवहार न समजून

घेता व्यावहारिक प्रेमाचं पीक अधिक वाढलयं. प्रेम जडलयं ते लग्न करण्यासाठीच, हा असाच एक चुकीचा समज ! लग्नासाठीच प्रेमाच नाटक, असाही स्वार्थ दिसतो. चिरवियोगाचा चिरदाह सहन करण्याची ताकद असल्या पुचाट अन् बुळ्या प्रेमिकांमध्ये नसते.

**'जैसें चित्त जयावरी ।**
**तैसें जवळीं तें दुरी ॥'**

अर्थात, जसं चित्त एखाद्यावर जडलेलं असतं, तशी ती व्यक्ती जवळ अथवा दूर असते. या तत्त्वाचं समर्थन काय करावं ? साक्षीभूत मन ग्वाही देतं. तेवढं पुरेसं असतं.

प्रेम करण्यासाठी आणि दुसऱ्याचं कळण्यासाठी मनाचं सामर्थ्य मोठ असावं लागतं. कुवत लागते. मुंगीच्या मुखात हत्तीला लागणारा आहार घातला तर त्या भारानं असह्य होऊन तिचा जीवच जाणार .

**'माझिये जातीचे**
**मज भेटो कोणी**
**आवडीची धणी**
**फेडावया ॥'**

परमेश्वरा ! माझ्या प्रीतीची इच्छा पूर्ण होण्यासाठी मला माझ्या जातीच-प्रेमिकांच्या जातीच कुणी भेटोत.

प्रेमाच्या 'विरोधी' प्रकार म्हणजे बदला घेणं ! वात्सल्याच्या पोटी अपयश आलं तर ? माता किंवा पिता हे आपल्या वाया गेलेल्या कुलदीपकांना संपवणं, ह्यातच प्रतिष्ठा मानतात. खरं तर व्यक्ती वाईट नसते, वृत्ती वाईट असते. तिच्यावर मात करणं आवश्यक असतं. व्यसनाधीन पुरुषाला वाऱ्यावर न सोडून देता स्त्रीनं त्याचं कारण शोधावं. मार्ग सापडतो. त्याला उशीर लागला तरी व्यसनमुक्त करता येतं.

तसंच, मैत्रीतही घडतं. एकानं दुसऱ्याला धोका दिला की लगेच सूड घेण्याची भाषा ! क्षमा करण्याचा मोठेपणा सूड घेण्यापेक्षाही श्रेष्ठ असतो, हे कळतंच नाही. प्रेमातही फारसं वेगळं बघायला मिळत नाही. प्रेमभंग झाला की, वेड लागणं हे जसं कमकुवत मनाचं लक्षण असतं तसंच राक्षसी वृत्तीचे लोक जीव घेण्याचे पराक्रम गाजवतात.

**'उचित न कळे ।**
**जिव्हा भलतेंचि वरळे ॥'**

योग्यायोग्य न समजल्यामुळे आपली जीभ भलतचं बरळते, पदार्थांच्या चवीतही गोड अन् कडूपणा जिभेला कळतो, तसा प्रेमळ आणि कठोर शब्दांतला फरक का कळू नये ? 'प्रेम लाभे प्रेमाला' हे संतवचन ठाऊक असूनही स्वतः कुणालाही दया-माया न दाखवता मरेपर्यंत तक्रार करायची - 'मला कुणाचं प्रेम नाही मिळालं.... नशीबच खत्रूड !' काय म्हणावं दुर्दैवाला !

प्रेमात, मैत्रीत किंवा वात्सल्यात रंगरूपाचा भाग 'भांडवल' म्हणूनच जोखला जातो. तरीही ज्यांना रंग नाही, रुप नाही ते वागण्यात गोडवा आणून जग जिंकू शकतात. अष्टावक्रमुनी अत्यंत कुरुप होते पण ज्ञानात -आत्मज्ञानात सर्वश्रेष्ठ म्हणून मान्यता पावले होते. शबरी काय देखणी होती?' तरुण होती ? तरीही आपल्या मधाळ वागण्यानं रामाचं मन जिंकलंच ना ? कुब्जेकडे काय होतं बघण्यासारखं? तरीही कृष्णाचं प्रेम मिळवलंच ना ? शरीर शृंगारून दुसऱ्याची वासना चाळवता येते, प्रेम नाही. त्यासाठी हृदयाला सद्गुणांनी शृंगाराव लागतं. स्वभावात साज असावा लागतो आणि स्पर्शात अलंकारांच मोल कळावं लागतं. मानतलं मनाला समजण्याची विद्या केवळ वात्सल्य, मैत्री आणि प्रेमानचं साध्य होते. ते साधलं की, मग अखंड प्रेमाचा कल्लोळच !

**अरविंद दोडे**
शालन भोईर वाडी, खोपट, ठाणे.
दूरध्वनी : ४१४७७०७.

• • •

# 'कारगिल एक आठवा'

*कारगिल युद्ध झाले. या घटनेला दोन वर्षे झाली. त्याची आठवण म्हणून आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'संयुजा' या वार्षिकातील (२०००) लेख पुनःप्रसिद्ध करीत आहोत. - संपादक*

'११ मे १९९८' पोखरणच्या वाळवंटात तब्बल २४ वर्षांनी बुद्ध पुन्हा हसला. २४ वर्षांपूर्वीचे त्याचे हास्य म्हणजे केवळ मंद स्मितच होते. पण यावेळेस मात्र त्याचे हास्य व्यापक होते. केंद्रात सत्तारूढ झालेल्या भाजपा आघाडी सरकारने सत्तेवर आल्याआल्याच पोखरण अणुचाचण्यांना हिरवा कंदिल दाखविला. याबाबतीत सरकारने दाखविलेले धाडस निश्चितच कौतुकास्पद होते. मात्र चाचण्या यशस्वी झाल्यानंतर देशांतर्गत व देशाबाहेर ज्या संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या त्या पाहता चाचण्यांमागचा मुख्य उद्देश जगासमोर मांडण्यात सरकारला पाहिजे तेवढे यश मिळाले नाही असेच म्हणावे लागेल. याचाच परिपाक म्हणजे देशावर लादले गेलेले निर्बंध व जगभरातून उमटलेल्या तीव्र प्रतिक्रिया. तसेच शेजारी राष्ट्रात (विशेषतः पाकिस्तानात, निर्माण झालेली अस्वस्थता. ह्या अस्वस्थतेचाच परिणाम म्हणून पाकिस्तानने महिन्याभरातच भारताच्या तोडीस तोड (?) अणुस्फोट घडवून आणले.

'भारताचा अणुकार्यक्रम हा कोणत्याही देशाविरूद्ध नसून केवळ आत्मरक्षणासाठीच आहे.' असे संसदेत निक्षून सांगणाऱ्या वाजपेयींना जेव्हा संसदेतच पाकिस्तानने घडवून आणलेल्या अणुस्फोटांची बातमी समजली तेव्हा, त्यांनी 'अणुचाचण्या करण्याचा सरकारचा निर्णय योग्यच होता हे आता सिद्धच झाले. परंतु हा दृष्टिकोन आता जगासमोर मांडण्यात सर्व देशाने एकजूट होण्याची गरज आहे.' असे प्रतिपादन केले. सरकारने कितीही प्रयत्न केले तरी पाकिस्तानी अणुस्फोटांमुळे दक्षिण आशियात नव्याने शस्त्रास्त्रस्पर्धा सुरू होण्याची कोणतीही शक्यता नाही हे सरकारचे प्रतिपादन जगभरात विशेषतः बड्या राष्ट्रांना मान्य होणे कठीण होते. त्यासाठी आवश्यकता होती एका ठोस विश्वासदर्शक कृतीची.

हा विश्वास निर्माण झाला तो पंतप्रधानांच्या ऐतिहासिक लाहोर बस यात्रेमुळे. या बसयात्रेची सर्वात मोठी फलनिष्पत्ती म्हणजे 'लाहोर जाहीरनामा' आणि 'काश्मिर प्रश्न शांततामय व द्विपक्षीय वाटाघाटींद्वारे सोडविणे' हे या जाहीरनाम्यात अंतर्भूत असलेले सर्वात महत्वाचे कलम. त्याचबरोबर या करारानंतर उभय पंतप्रधानांनी भविष्यात लाहोर जाहिरनाम्यान्वयेच वाटाघाटी पुढे चालू ठेवण्यासंबंधी व्यक्त केलेल्या निश्चयाने उपखंडातील राजकीय समीकरणे बदलण्याची नवीन आशा निर्माण झाली. परंतु वाजपेयी सरकारच्या या सर्व यशस्वी प्रयत्नांना एकाएकी खीळ बसली ती राजकीय पटावरील उलथापालथींमुळे. संसदेतील विश्वासदर्शक प्रस्तावावर भाजपा आघाडी सरकारचा 'एक' मताने पराभव झाला आणि भारतीय लोकशाही पुन्हा एकदा अस्थिरतेच्या खाईत लोटली गेली. केंद्रात सरकार अस्तित्वात नाही, राजकीय आघाडीवर प्रत्येकजण पुढील व्यूहरचनेच्या आखणीत मश्गुल आणि देशभरात सर्वांचे लक्ष दिल्लीतील राजकीय घडामोडींवर अशा या पार्श्वभूमीवर मे च्या मध्यावर अचानक खबर येते ती 'कारगिल घुसखोरीची.'

उन्हाळ्यात बर्फ वितळल्यानंतर भारत-पाक नियंत्रण रेषेवरील (Line of Control) हिवाळ्यात सोडून दिलेल्या कारगिल द्रास, बटालिक सारख्या क्षेत्रातील आपापल्या चौक्यांवर परतलेल्या भारतीय जवानांना तेथे अगोदरच ठाण मांडून बसलेल्या घुसखोरांना पाहिल्यावर एकंदर परिस्थितीची कल्पना आली. घुसखोरांनी

बळकावलेल्या चौक्यांची उंची व खराब हवामान यामुळे सुरूवातीला घुसखोरीचा अंदाज वर्तवण्यात अडचणी येत होत्या. घुसखोरांनी उभारलेले बंकर्स, अत्यानुधिक शस्त्रांस्त्रांसह होणारा मारा आणि लष्करात सिग्नल कोअरकडून पकडल्या गेलेल्या संदेशावरून हे दुसरे तिसरे कोणी नसून घुसखोरांच्या वेषात पाक सैनिकच आहेत हे लक्षात येण्यास भारतीय सैन्यास फार वेळ लागला नाही.

भारत-पाक नियंत्रणरेषेपासून काही किलोमीटर आत असलेले कारगिल क्षेत्र हे भारतीय भूभागावरील लष्करीदृष्ट्या अत्यंत मोक्याचे ठिकाण. कारण, उत्तरेकडील लडाख व इतर अत्यंत महत्वाच्या भारतीय ठाण्यांना उर्वरीत भूप्रदेशाशी जोडणारा एकमेव महामार्ग हा कारगिल जवळूनच जातो. तेव्हा कारगिल व त्याच्या आसपासच्या पहाडांवर एकदा का शत्रूने कब्जा केला की लडाख व उत्तरेकडील इतर महत्त्वाच्या ठाण्यांना भारतीय भूभागापासून तोडण्यास त्याला फार वेळ लागणार नाही हा धोका ओळखूनच भारतीय सैन्याने पुढील पाऊले टाकली. घुसखोरांनी बळकावलेल्या चौक्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील बहुतांशी चौक्या उंच टेकड्यांवर म्हणजे लष्करीदृष्ट्या त्यांची स्थिती आपल्यापेक्षा अधिक सुरक्षित. शिवाय त्या वर्षातून बहुतांश काळ बर्फाच्छादित व तापमान शून्याखाली ३०°च्या आसपास यामुळे भारतीय जवानांना तेथील हाडं गोठवणाऱ्या थंडीशी सर्वप्रथम जुळवून घेऊन मगच हल्लाबोल करावा लागणार होता आणि ह्या गोष्टीला वेळ हा लागणारच होता. ही गोष्ट आपल्याला परवडणारी नव्हती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सरकारने भारतीय वायूसेनेला तात्काळ लष्कराच्या मदतीसाठी पाचारण केले. हा अत्यंत योग्य निर्णय होता. इकडे दिल्लीतही घुसखोरांना हुसकावून लावण्यासाठी सर्वोच्च पातळीवरून लष्करी आणि राजकीय डावपेचांना वेग आला आणि नियंत्रण रेषेवरून घुसखोरांना हुसकवण्यासाठी भारतीय लष्कराने सुरू केले 'ऑपरेशन विजय.'

सर्वप्रथम भारतीय हवाईदलाने मिग-२१, मिग-२३, मिग-२५, जॅग्वार्स यासारख्या अत्याधुनिक जेट विमाने व हेलीकॉप्टर्सच्या सहाय्याने तो भाग पिंजून काढावयास सुरूवात केली. स्टिंगरसारख्या अमेरिकी बनावटीच्या अत्याधुनिक हेलीकॉप्टरविरोधी क्षेपणास्त्रांनी आपल्या लढाऊ विमाने व हेलीकॉप्टर्सवर सुरक्षित, बर्फाच्छादित बंकर्समधून मारा करणाऱ्या घुसखोरांच्या एवढ्या उंचीवरून अचूक ठावठिकाणा लावून त्यांना नष्ट करणे हे हवाईदलापुढे एक तगडे आव्हानच होते. आपल्या धाडसी वैमानिकांनी हे आव्हान स्विकारले. एवढ्या उंचीवरून सुरक्षित बंकर्समध्ये लपून बसलेल्या घुसखोरांचा विमानाच्या पोटात दडवलेल्या अत्याधुनिक फोटोग्राफिक यंत्रणेद्वारा अचूक ठावठिकाणा लावून त्याद्वारे पुढील हल्ल्यासाठी अचूक नकाशे बनविले गेले. भारतीय लष्करानेही याच नकाशांच्या मदतीने अचूक कामगिरीसाठी आपली व्यूहरचना सिद्ध केली.

अशा रितीने पूर्व तयारी पार पडल्यानंतर रणशिंग फुंकले गेले. लष्कर व हवाई दलाने एकाचवेळी हल्ल्यांना सुरूवात केली. कारगिल, द्रास, बटालिक क्षेत्रात घुसखोर व्याप्त ठिकाणांवर जमिनीवरून लष्कराच्या आर्टिलरी कोअरने मारा सुरू केला. बोफोर्ससारख्या अत्याधुनिक फिल्डगन्स घुसखोरांच्या बंकर्सवर आग ओकू लागल्या. हवाईदलाची मिग-२१, मिग-२३, मिग-२९ व जॅग्वार्स लढाऊ विमाने त्यांच्या ठिकाणांवर अचूक प्रहार करीत होती. जमिनीवरून व आकाशातून एकाचवेळी हल्ले सुरू झाल्यामुळे घुसखोर भांबावून गेले. दोन्ही दलांनी आपापल्या माऱ्याची तीव्रता हळूहळू वाढवत गेली. हवाईदलाने 'मिराज-२०००' सारख्या अत्याधुनिक फायटर बॉम्बर्सना आपल्या ताफ्यात सामील करून आपला मारा अधिक धारदार केला. शिवाय हवाई हल्ल्यांची दैनंदिन संख्या वाढवून दिवस-रात्र हल्ले चालू ठेवले. जसजशी हल्ल्यांची तीव्रता वाढत गेली, तसतसे घुसखोरांचे नीतिधैर्य खच्ची होऊ लागले. महत्वाची गोष्ट म्हणजे नियंत्रण रेषेवरून

शत्रूच्या ठिकाणांवर मारा करताना आपल्या वैमानिकांना नियंत्रण रेषेचे उल्लंघन होणार नाही याची सतत काळजी घ्यावी लागत होती. कारण आंतरराष्ट्रीय सीमारेषा नियमांनुसार कोणत्याही देशाच्या हवाई हद्दीचा दुसऱ्या राष्ट्राकडून भंग झाल्यास त्या देशाला त्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्याची मुभा असते आणि कांगावखोर पाकिस्तान अशा संधीच्या शोधातच होता. पण आपल्या वैमानिकांनी त्यांना शेवटपर्यंत अशी संधी मिळू न देता घुसखोरांना नष्ट केले यातच त्यांचे कौशल्य दिसून येते.

केवळ नकाशांवरून त्या बर्फाच्छादित टेकड्यांवरील घुसखोरांच्या गुप्त ठिकाणांचा छडा लावणे आपल्या वैमानिकांना खरोखरीच कठीण होते. यासाठी त्यांनी एक नामी क्लृप्ती लढवली, सर्वप्रथम नकाशाबरहुकूमच हल्ला करायचा. साहजिकच, त्यांच्याकडून याला प्रत्युत्तर मिळणार आणि त्यांच्या या प्रतिहल्ल्यावरून त्यांच्या गुप्त ठिकाणांचा अचूक अंदाज आपल्या वैमानिकांना येत होता. अशा रितीने त्यांनी शत्रूची जास्तीत जास्त ठिकाणे नष्ट केली. भारतीय लष्करानेही आता आपले पाश आवळायला सुरुवात केली होती. लष्कराने सर्वप्रथम त्यांच्या ठिकाणांवर जमिनीवरून जबरदस्त आर्टिलरी फायरिंग करून ती उध्वस्त केली. पण त्याचबरोबर त्यांना तेथून कायमचे हुसकवण्यासाठी 'प्रत्यक्ष कारवाई' ची गरज होती. त्यासाठी भारतीय लष्करातील विविध कंपन्या व बटालियन्सनी हुकुमाप्रमाणे आपापल्या नेमून दिलेल्या जागी मोर्चेबांधणी केली. मोर्चेबांधणीनंतर प्रत्येक ठिकाणची कंपनी वा बटालियन पहाडांवरील घुसखोरांची ठिकाणे व त्यांची संख्या यांचा अचूक अंदाज, त्यांच्यामार्फत पोहोचवण्याचा सुरक्षित मार्ग इत्यादी गोष्टींचा अभ्यास करून आपापल्या व्यूहरचनेसह प्रत्यक्ष कारवाईसाठी सज्ज झाली आणि 'ऑपरेशन विजय' एका निर्णायक टप्प्यात पोहोचले.

प्रत्यक्ष कारवाईदरम्यान आपल्या जवानांना शत्रूच्या ठिकाणापर्यंत पोहचवण्यासाठी बर्फाच्छादित डोंगर चढावे लागणार होते जे वाटते तितके सोपे नाही. कारण, चुकून जर एखाद्या जवानाचा पाय भुसभुशीत बर्फाने भरलेल्या खोल खड्ड्यात गेला तर त्याचा कपाळमोक्ष ठरलेलाच! तेव्हा पुरेशी काळजी घेऊनच हल्ला करावा लागणार होता. घुसखोरांना या हल्ल्याची खबर लागू नये म्हणून आर्टिलरी कोअरने आपल्या फिल्ड गन्स सतत धडाडत ठेवून घुसखोरांना त्यात गुंतवून ठेवले. कारगिल, द्रास, बटालिक क्षेत्रात प्रत्येक घुसखोरांच्या ठिकाणांवर प्रत्यक्ष कारवाईस सुरुवात झाली आणि या कारवाई दरम्यान सर्वात चित्तथरारक ठरली ती 'टायगर हिल' वरील.

'टायगर हिल' सारखा टापू म्हणजे कारगिल क्षेत्रातील अत्यंत मोक्याचे ठिकाण. कारण येथील बर्फाच्छादित टेकड्यांवरील बंकर्समधून कारगिल जवळून लडाखकडे जाणाऱ्या महामार्गावर घुसखोरांचे हल्ले चालू होते. त्यामुळे एकदा का तेथून घुसखोरांना हुसकावले म्हणजे इतर टेकड्यांवर टायगरहिलच्या उंचीमुळे हल्ला करणे सोपे जाणार होते. यामुळे आदेश मिळताच टायगर हिल च्या पायथ्याशी तैनात कंपनीने पायथ्याकडूनच होणाऱ्या आर्टिलरी फायरिंगला प्रत्युत्तर देण्यात गुंतलेल्या घुसखोरांना पहाटेच्या अंधारात अनपेक्षितरित्या विरुद्ध बाजूने हल्ला करून त्यांना कंठस्नान घातले आणि उगवत्या सूर्याच्या साक्षीने टायगर हिलवर तिरंगा फडकला. टायगर हिल पाठोपाठ इतर चौक्यांवरही भारतीय सैन्याने ताबा मिळवला आणि जवळजवळ महिन्याभराच्या कारवाईत 'ऑपरेशन विजय' अंतर्गत भारतीय लष्कराने नियंत्रण रेषेवरील जवळजवळ सर्वच चौक्या परत मिळवल्या.

भारतीय सैन्य नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावीत असताना इकडे भारत सरकार राजनैतिक स्तरावरही पाकिस्तानचा पर्दाफाश करण्यासाठी जोरदार प्रयत्न करीत होते. 'ऑपरेशन विजय' ऐन भरात असताना भारतीय सैन्य आता कुठल्याही क्षणी नियंत्रण रेषा पार करून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देणार असे अंदाज वर्तवले जात होते. पण सरकार व लष्कर दोघांनीही

शेवटपर्यंत संयम बाळगला. याचा परिणाम असा झाला की, हल्ला भारताने नसून पाकिस्तानने केला आहे हे जगाला कळून चुकले. शिवाय संयमी कारवाईमुळे भारतीय सैन्याला घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक नसून घुसखोरांच्या वेषात पाक सैनिकच आहेत आणि कारगिलचा उठाव हा कुठल्याही काश्मिरी स्वातंत्र्यसंघटनेने केलाला नसून त्यापाठी पाकिस्तानचाच हात आहे हे सिद्ध करण्यासाठी भक्कम पुरावे गोळा करता आले. ज्याद्वारे पाकिस्तान जागतिक स्तरावरही उघडा पडला. नियंत्रण रेषा ओलांडली असती तर परिणाम वेगळा झाला असता. भारताच्या राजनैतिक मुत्सदेगिरीमुळे संपूर्ण जगभरातून पाकिस्तानवर दबाव वाढत होता. शिवाय लष्करी आणि राजनैतिक अशा दोन्ही आघाड्यांवर सपाटून मार खाल्ल्यामुळे नीतीधैर्य पार उध्वस्त झालेल्या पाकिस्तानला नामुष्की टाळण्यासाठी माघारी शिवाय दुसरा पर्याय नव्हता.

अखेरीस या धामधुमीतच पाक पंतप्रधानांनी आपल्या अमेरिकावारीच्या राजकीय नाट्यानंतर माघारीचा निर्णय घेतला. पाक घुसखोरांबरोबर खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या लष्कर-ए-तोयबा सारख्या कडव्या घुसखोर संघटनेने तो धुडकावून लावीत आपली 'जंग' सुरूच ठेवली. भारतीय सेना मात्र शेवटचा घुसखोर हुसकावला जाईपर्यंत कारवाई सुरूच राहील या निश्चयावर ठाम राहीली. शेवटी अमेरिका व इतर बड्या राष्ट्रांनी कान उपटल्यानंतर आणि भारतीय लष्करासमोर आपला फार काळ निभाव लागणार नाही हे कळून चुकल्यामुळे माघारीला सुरूवात झाली. भारत सरकारने ठरवून दिलेल्या मुदतीत लष्करी देखरेखीखाली घुसखोरांना आल्यापावली परत जावे लागले आणि अशारितीने 'ऑपरेशन विजय' यशस्वीरित्या समाप्त झाले.

कारगिल संघर्षाचा आढावा घेताना काही गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात त्या म्हणजे पाकिस्तानने ज्या पद्धतीने भारताचा विश्वासघात करून लाहोर शांती प्रक्रियेला हरताळ फासला ते पाहता यापुढे नजिकच्या भविष्यात दोन्ही देशातील संबंध सुधारणे कठीण आहे. त्याचबरोबर सलग चौथ्यांदा भारताकडून पराभवाची नामुष्की पत्करावी लागल्यामुळे पाकिस्तानी लष्कर व शासन यांच्यात जी तेढ निर्माण झाली आहे त्यामुळे तेथे भविष्यात मोठ्या राजकीय उलथापालथीची शक्यता आहे. याशिवाय 'ऑपरेशन विजय' च्या यशस्वितेबरोबरच आणखी एक मानाचा तुरा भारतीय सैन्यदलाच्या शिरपेचात खोवला गेला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारताच्या राजनैतिक मुत्सेगिरीस मिळालेले व्यापक यश. आधीच्या तिन्ही युद्धांपेक्षा या संघर्षातील भारताची मुत्सेगिरीतील कामगिरी निश्चितच उजवी आहे. चीन व अमेरिकेसारख्या पाकिस्तानला अनुकूल राष्ट्रांनी यावेळी उघडपणे भारताला अनुकूल भूमिका घ्यावी हे यावेळी प्रथमच घडले आहे. त्याचबरोबर भारताच्या संयमी प्रत्युत्तरामुळे पाकिस्तानचा कांगावखोरपणा जगासमोर उघड झाला आहे. त्यामुळे काश्मिर खोऱ्यातील पाक पुरस्कृत दहशतवाद जगासमोर आणण्यात यापुढे भारताला सोपे जाणार आहे.

त्याचबरोबर संपूर्ण कारगिल संघर्षादरम्यान भारतीय जवान नियंत्रण रेषेवर प्राणपणाने लढत असताना 'संकटात आम्ही एकशे पाच' या भारतीय परंपरेला अनुसरून संबंध देश त्यांच्या पाठीशी उभा होता. ही निश्चितच अभिमानास्पद गोष्ट आहे. या कारवाईत स्कॉड्रन लीडर अजय आहूजा, लेफ्टनंट मनोज पांडे, मेजर विवेक गुप्ता यांसारख्या जवळजवळ ८०० जवान व अधिकाऱ्यांनी केलेले बलिदान देश कधीही विसरणार नाही. या शूरविरांच्या यशोगाथा पुढील पिढ्यांना निश्चितच स्फूर्तिदायक ठरतील, हे नि संशय!

**अवधूत जोशी**

(संयुजा २००० वरून साभार)

• • •

# परिसर वार्ता
# भविष्याचा वेध घेणारी गर्दी

मोहन पाठक

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात म्हणजे नवे चेहरे, नवीन प्रश्न, नवीन अभ्यासक्रमांच्या चर्चा यांच्या गर्दीचे दिवस. महाविद्यालय परिसरात मे महिन्याच्या सुटीनंतर पुनश्च प्रचंड वर्दळ सुरु झाली आहे. कोणी अॅडमिशनसाठी, कोणी अॅटेस्टेशनसाठी तर कोणी निकालाच्या अपेक्षित महाविद्यालय परिसरात सतत येत असतात. विद्यार्थी, पालक यांच्या प्रत्येकाच्या येण्या जाण्यात काही कामं असतात. भविष्यालाच पडणारी वर्तमानातील स्वप्नं महाविद्यालय परिसरात क्षितीज शोधत असतात.

## विज्ञान महाविद्यालय

या पार्श्वभूमीवर आमच्या विज्ञान महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ही नोंद घ्यावी अशी पहिली वार्ता आहे. ९० ते ९५% इतका निकाल ही गेल्या कित्येक वर्षांची परंपरा आहे. विज्ञान महाविद्यालयाचा बारावीचा निकाल यंदा ही ९३.१७% इतका लागला. ८८.६६% गुण मिळवणारा प्रदीप यादव महाविद्यालयात सर्वप्रथम आला. महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनी प्रदीपसह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.



प्रदीप यादव

मार्च २००१ मध्ये झालेल्या या परीक्षेत महाविद्यालयातून ३९९ विद्यार्थी बसले होते. या पैकी १०५ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह (डिस्टींक्शन मिळवून) उत्तीर्ण झाले. १६४ विद्यार्थी प्रथम वर्गात, ९८ विद्यार्थी द्वितीय वर्गात तर ५ विद्यार्थी उत्तीर्ण वर्गात उत्तीर्ण झाले आहेत. विशेष जाणवलेली बाब म्हणजे प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये एकही विद्यार्थिनी नाही. महाविद्यालयातून दुसरा क्रमांक दिलीप पेसवानी (८८.०५%) याला तर तिसरा क्रमांक सिद्धेश फडके (८७.०५%) याला मिळाला आहे. निकालाच्या दिवशी प्राचार्य सी.जी. पाटील यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित, प्रा. एस्.डी. अत्तरदे, प्रा.आर्.टी. कुलकर्णी व कनिष्ठ महाविद्यालयातील काही प्राध्यापक उपस्थित होते. विषयवार प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी | दिलीप पेसवानी | ८७ गुण |
| मराठी | मयुरी वैद्य | ८५ गुण |
| हिंदी | तृषा सावंत | ७६ गुण |
| गणित | दिलीप पेसवानी | ९८ गुण |
| | शौनक चिटणीस | ९८ गुण |
| पदार्थविज्ञान | सिद्धेश फडके | ९९ गुण |
| | ओंकार वैद्य | ९९ गुण |
| रसायनशास्त्र | योगेश निवानगुणे | ९८ गुण |
| | प्रदीप यादव | ९६ गुण |

## दहावीचा निकाल

बारावीनंतर दहावीच्या निकालाचे वेध विद्यार्थ्यांना लागलेले असतात. आमच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) या शाळचा मार्च २००१ मध्ये झालेल्या या परीक्षेचा निकाल ९४.६३% लागला आहे. गुणवत्ता यादीत विद्यार्थी चमकणे ही आमच्या शाळेची खास परंपरा. यंदा प्रणव मिलींद पेंडसे ६८२ गुण (९०.९३%) मिळवून मुंबई बोर्डाच्या गुणवत्ता यादीत १८व्या क्रमांकाने चमकला आहे. प्रणवचे हार्दिक अभिनंदन ! विषयवार प्रथम येणारांची माहिती मात्र उपलब्ध होऊ शकली नाही.

आमच्या संस्थेच्याच सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा निकाल गेली अनेक वर्षे १००% लागत आहे. यंदाही १६५ पैकी १६५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ही परंपरा चालू राहिली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी व त्यांच्या सहकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रथम वर्ग | (८५% च्या वर) | १३ विद्यार्थी |
| | (८०% च्या वर) | ४० विद्यार्थी |
| | (७५% च्या वर) | ९ विद्यार्थी |
| | (६०% च्या वर) | ६९ विद्यार्थी |
| द्वितीय वर्ग | (६०% पेक्षा कमी ) | ३४ विद्यार्थी |

अशी निकालाची आकडेवारी आहे. या निकालाची माहिती देताना सौ. कोल्हटकर मॅडम यांनी प्रथम दहा विद्यार्थ्यांचीही नावे दिली आहेत. ती पुढील प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १) | मानसी बापट | ९०% |
| २) | प्रसाद लाड | ८९.६०% |
| ३) | सौरभ सरदेशपांडे | ८९.०६% |
| ३) | शीतल हळदवणेकर | ८९.०६% |
| ४) | उदय कुलकर्णी | ८८.८०% |
| ५) | सत्यजित शाळिग्राम | ८८.१३% |
| ६) | कुशल कोळी | ८८.००% |
| ७) | अमेय म्हात्रे | ८७.३३% |
| ८) | अमित पवार | ८६.५३% |
| ९) | आरती रामनाथन | ८६.१३% |
| ९) | प्रियंका बाबर | ८६.१३% |
| १०) | धवल पट्टेकर | ८५.६०% |

**विषयात प्रथम येणारांचे गुण असे-**

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी | सौरभ सरदेशपांडे | ७८ |
| | सत्यजित शाळिग्राम | ७८ |
| | हिराल लाला | ७८ |
| मराठी | तेजस देसाई | ८७ |
| संस्कृत | सत्यजित शाळिग्राम | ९४ |
| हिंदी | पंकज वैद्य | ७३ |
| गणित | प्रणाली केळकर | १४६/१५० |
| | अमेय म्हात्रे | १४६/१५० |
| विज्ञान | उदय कुलकर्णी | १४८/१५० |
| समाज शास्त्र | मानसी बापट | १४४/१५० |

## ग्रंथालय शास्त्र

आमच्या सर्व घटक संस्थाकडून उपलब्ध झालेला निकालापैकी मुंबई विद्यापीठाचा जो अभ्यासक्रम विद्यापीठा बाहेर प्रथमच व आमच्या कला वाणिज्य महाविद्यालयाला देण्यात आला त्याचा निकालाही महत्त्वाचा आहे. कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य स. वा. गोखले यांनी

याबद्दल माहिती देतांना सांगितले की पहिल्याच तुकडीचा निकाल ६७% इतका लागणे अतिशय अभिनंदनीय आहे. या वर्षी मान्यता उशीरा आल्याने हा अभ्यासक्रम उशीरा चालू झाला होता.

विशेष म्हणजे महाविद्यालयातून प्रथम आलेली स्वप्ना देसाई विद्यापीठातून द्वितीय क्रमांकाने तर महाविद्यालयात द्वितीय आलेली आदिती थिटे विद्यापीठातून चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

या अभ्यासक्रमाचे संयोजक व कला वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे व त्यांचे सहकारी शिक्षक यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

**प्रवेश समस्या**

बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश देऊनही अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले. त्यांचा केंद्रीभूत प्रवेश करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने जी केंद्रे उघडली त्यात आमचे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयही आहे. सदर परिसर वार्ता लिहीत असताना या प्रवेश अर्ज विक्री केंद्राचे काम चालू आहे.


कला वाणिज्य महाविद्यालयाकडून नुकत्याच प्राप्त झालेल्या माहिती नुसार उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचा (बारावीचा) निकाल शाखानिहाय पुढील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कला शाखा | ७१.६१% |
| वाणिज्य शाखा | ९३.१३% |

परिसर वार्तात आपल्या संस्थेत होणारे सर्व उपक्रम, आपले निकाल यांची माहिती वेळो वेळी येणे अपेक्षित आहे. त्यामुळे सर्व संस्थाप्रमुखांना माझी नम्र विनंती आहे की शक्य तोवर तपशीलात सर्व माहिती माझ्याकडे येईल असे कृपया पहावे. सहकार्याच्या अपेक्षेत !

•••

## कविता



चितेसारखे जाळ मला वा,
फुलासारखे माळ मला,
शब्दांनी हेटाळ मला पण,
नजरेने कुरवाळ मला.
आजाऱ्याला औषध तारी,
तशीच तूही गुणकारी,
सांग हवे तर पथ्य मला,
पथ्यासम सांभाळ मला.
विसरशील वा हरवशील मज,
नको सोपवू कुणाकडे
'मी' कवितेचे पुस्तक हळवे,
वाच मला वा चाळ मला !

- रुपाली सावरे